www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दैं.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 240 वा गुरुवार दि. 15 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## फुंडे हायस्कूल चा दहावीचा निकाल ९२.५२%

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर




रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे हे उरण तालुक्यातील एक नावाजलेल हायस्कूल आहे. दरवर्षीप्रमाणे आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये दहावीचा निकाल ९२.५२% लागला आहे. यामध्ये कुमारी कोळी श्रावणी जयदास ९५ टक्के गुण मिळून प्रथम क्रमांकाने तर कुमारी चव्हाण वैष्णवी अंकुश ८९.८०% गुण मिळून द्वितीय आणि कुमारी म्हात्रे वीरश्री महेश ८६.८०% गुण मिळून विद्यालयात तृतीय आलेली आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे चेअरमन श्री कृष्णाजी कडू, सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य श्री साळुंखे बी.बी. सर,उपमुख्याध्यापिका सौ थोरात एस. डी.मॅडम,पर्यवेक्षिका सौ बाबर मॅडम,सौ पाटील एस. एस.मॅडम,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

## सीसीटीव्ही लावा, कर्मचाऱ्यांची अल्कोहल टेस्ट करा आणि.

### राज्य सरकारची शाळांसाठी नवी नियमावली

महाराष्ट्र सरकारने लहान मुलांचं लैंगिक शोषण थांबवण्यासाठी राज्यातील शाळांसाठी नवी नियमावली जाहीर केली. त्यानुसार, राज्यातील प्रत्येक शाळांत सीसीटीव्ही कॅमेरा बसवणे अनिवार्य असेल. याशिवाय, मुलांसाठी सत्रांचे आयोजन करणे, शालेय कर्मचाऱ्यांची तपासणी करणे बंधनकारक करण्यात आली. नियमांचे पालन न केल्यास सरकारी अनुदान रोखणे किंवा शाळेची मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई केली जाऊ शकते. ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमधील एका नामांकीत शाळेतील दोन चिमुकलींवर अत्याचार करण्यात झाला. या पार्श्वभूमीवर शाळांमधील सुरक्षा वाढवण्यासाठी हे नवीन नियम बनवण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने १३ मे २०२५ रोजी एक जीआर जारी केला. त्यानुसार, १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला अल्पवयीन मानले जाईल.शाळेत कोणताही गुन्हा घडल्यास त्याची माहिती स्थानिक पोलिसांना किंवा बाल कल्याण पोलीस विभागला देणे बंधनकारक आहे.



**राज्य सरकारची नियमावली**

- सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य आहे, कॅमेऱ्यांचे फुटेज किमान एक महिना जपून ठेवणे बंधनकारक.
- शक्य असल्यास पूर्व-प्राथमिक ते इयत्ता सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी महिला शिक्षकांची नियुक्ती करा.
- शालेय कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करा, आवश्यक असल्यास चारित्र्य प्रमाणपत्र घ्या.
- बसचालकासह इतर कर्मचाऱ्यांची नियमितपणे अल्कोहल चाचणी करणे आवश्यक आहे.
- प्रत्येक स्कूल बसमध्ये एक महिला कर्मचारी असणे अनिवार्य आहे
- शाळेच्या आवारात १०९८ हा चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक भागात लावावा.
- मुले शाळेत गैरहजर असतील, तर मेसेजद्वारे त्यांच्या पालकांना सूचना द्यावी.
- मानसिक दबावाखाली असलेल्या किंवा त्रासलेल्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सत्रांचे आयोजन करावे
- **लहान मुलांना 'गुड टच' आणि 'बॅड टच' बद्दल माहिती द्यावी.**

## आमदार राजेश पवार यांच्या वाढदिवसा निमित धुपा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन...!

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

**नांदेड -** नायगाव विधानसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार राजेश पवार यांचा अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त दरवर्षी प्रमाने आज १४ मे २०२५ रोजी धुप्पा येथे दरवर्षि प्रमाणे याही वर्षी भव्य मोफत आरोग्य शिबिर व मोफत औषधी वाटप कार्यक्रमाचे आयोजन नांदेड जिल्हा दुरुसंचार समिती सदस्य तथा भारतीय जनता पार्टी नायगाव तालुका सरचिटणीस अवकाश पाटील धुपेकर यांनी केले आहे. नायगाव विधानसभेचे लोकप्रिय आमदार राजेशजी पवार यांच्या वाढदिवसा निमित्त दरवर्षी प्रमाने धूप्पा ता. नायगाव येथे आज १४ मे रोजी सकाळी ९ ते २ या वेळेत जि.प.प्रा. शाळा धुप्पा येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी नायगाव ग्रामीन रूग्नालय व माजरम प्रार्थमिक आरोग्य केद्राच्या वतिने मोफत आरोग्य शिबिर व मोफत औषध वाटप करण्यात येणार आहे. या आरोग्य शिबिरास नायगाव ग्रामीन हॉस्पिटलचे वैधकिय अधिकारी डॉ. संतोष जाधव साहेब कान, नाक, घसा तज्ञ व डॉ. पी. आर. बोखारे साहेब स्त्रीरोग तज्ञ, डॉ. अविनाश कोठाळकर साहेब RBSK-2 , व डॉ. तृप्ती बिराजदार मॅडम RBSK-2 , व श्री तुराव पठान साहेब औषध निर्माण RBSK-2 , व श्रीमंती रेखा राजबंडेवार मॅडम, ANM RBSK-2 , व डॉ. जावेद सय्यद साहेब समुदाय आरोग्य अधिकारी, ज्योती ढवळे परिचारिका, व प्रियंका ससाने परिचारीका ईत्यादि वैद्यकिय अधिकारी डॉक्टरचि टिम ऊपस्थित राहनार आहे तरि नायगाव तालुक्यातिल व धुप्पा पंचक्रोशितिल, परिसरातिल, व गावातिल नागरिकांनी व माता भगिनींनी, या भव्य मोफत आरोग्य शिबिराचा व मोफत औषधी वाटपाचा लाभ घ्यावा असे आव्हान आरोग्य शिबाराचे आयोजक अवकाश पाटिल धुपेकर नांदेड दुरसचांर सल्लागार समिती सदस्य तथा भाजप नायगाव तालुका सरचिटणीस यांनी केले आहे.




## बालमोहन विद्यामंदिर पुन्हा अव्वल उज्वल परंपरेला सन्मान.

**दैनिक युवक आधार**
**दादर,प्रतिनिधी:**
**- मयुर प्रकाश धुरी**



शिवाजी पार्क येथील प्रतिष्ठित बालमोहन विद्यामंदिर शाळेच्या दक्षा परब हिने यंदाच्या CBSE दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत ९८.८० टक्के गुण मिळवले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे तिने विज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत उत्कृष्टतेचं प्रतीक निर्माण केलं. यावर्षी शाळेतील ३४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमठवला आहे. बालमोहन विद्यामंदिरने गेल्या १५ वर्षांपासून CBSE बोर्डात उच्च गुणवत्तेची परंपरा अखंडपणे जपली आहे. शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमामुळे हे यश शक्य झाल्याचं मुख्याध्यापकांनी सांगितलं. शाळेच्या यशाची ही घौडदौड पुढेही असंच सुरू राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## . आर. पी. इंग्लिश स्कूल, पाणदिवेचा या वर्षी सुद्धा दहावीचा 100% निकाल

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी /हेमाली पाटील**

दि. 14 मे 2025:- हुतात्मा परशुराम रामा पाटील शिक्षण संस्था संचलित, पुंडलिक रामा पाटील इंग्लिश स्कूल पाणदिवे, उरण मधील इयत्ता दहावीचा निकाल 100% लागला. मंगळवार दि. 13 मे 2025 रोजी दुपारी 1 वाजता महाराष्ट्र राज्य बोर्डाने S. S. C. चा निकाल घोषित केले. शाळेतील एकूण 37 विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सर्वच म्हणेज 37 विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. कु. तन्वी रोशन पाटील -91.40% प्रथम क्रमांक, कु. मैत्री गणेश ठाकूर -87.40% द्वितीय क्रमांक तर कु. यश बाळू पुर्भे -84.20% तृतीय क्रमांकांचे मानकरी ठरले. विशेष प्राविण्य मिळवून या विदयार्थ्यांनी शाळेच्या शिरपेचात यशाचा तुरा रोवला आहे. पी. आर. पी. इंग्लिश स्कूल पाणदिवे या शाळेची दरवर्षी दहावीचा निकाल 100% लागण्याची परंपरा आहे.सलग 10 वर्षे 100% निकाल लागतो. परीक्षेस बसणारे सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास होत असतात.या साठी सर्व शिक्षकवृंद अविरत मेहनत घेत असतात. उत्तीर्ण झालेल्या सर्व विदयार्थ्यांचे व शाळेचे सर्वच स्तरावरून कौतुक होत आहे. शाळेचे चेअरमन, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख, सर्व शिक्षक शिक्षिका, शाळा व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ, पालकवर्ग, मार्गदर्शक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनस्वी हार्दिक अभिनंदन केले.

## पनवेल शहर पोलीस ठाण्याचे कोंबिंग ऑपरेशन तसेच ऑल आऊट दरम्यान मोठ्या प्रमाणात कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पोलिसांच्या विशेष पथकाने कोंबिंग ऑपरेशन तसेच ऑलआऊट केल्याने मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 2 चे प्रशांत मोहिते, सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभागचे अशोक राजपूत, वपोनि नितीन ठाकरे, पो.नि.शाकीर पटेल व अभंग यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत नवनाथ नगर झोपडपट्टी, रेल्वे स्टेशन परिसर या भागामध्ये कोंबींग आपरेशन तसेच ऑल आऊट दरम्यान मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. यामध्ये एनडीपीएस सेवन अंतर्गत एकावर कारवाई, बेकायदेशीररित्या दारु विक्री संदर्भात तीघांवर कारवाई, मोटार वाहन कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तीघा जणांवर कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिवशंभू नाका येथे नाकाबंदी दरम्यान 79 वाहने चेक करण्यात आली असून एकुण 27 वाहनांवर मोटार वाहन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली होती. तसेच नवनाथ नगर झोपडपट्टी व रेल्वे स्टेशन परिसर येथे कोंबिंग ऑपरेशन राबवून सदर ठिकाणी परकीय नागरिक अथवा बांगलादेशी नागरिक यांचा शोध घेण्यात आला. हॉटेल, लॉज तपासणी करण्यात आली. या कारवाई दरम्यान 08 सपोनि/पोउपनि , 21 अमलदार, आरसीपी पथक असे सहभागी झाले होते.



## मालेगाव येथील पुष्पक अनिल बळी सी.बी.एस.ई बोर्ड दहावी च्या परीक्षेमध्ये 97.60 मार्क्स घेऊन अव्वल..!!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार पाटील.**

शुद्ध बीजापोटी ।
फळे रसाळ गोमटी ॥ या संत तुकाराम महाराजांच्या अभंगानुसार मालेगाव येथील नंगे नाथाच्या चरणी असणाऱ्या श्रीक्षेत्र डव्हा येथे शिक्षक पदाची नोकरी करीत असलेले व पत्नी अर्धांगिनी सावित्री उर्फ सौ सविता उच्च विद्या विभूषित पोस्ट ग्रॅज्युएट एम.ए.मराठी,राज्यशास्त्र, हिंदी,बीएड.कॉम्प्युटर मध्ये घेतलेले बरेचसे डिप्लोमे. या दांपत्याच्या सुसंस्कारात शिक्षण घेत असल्याने दोन मुले पुष्पक व सोमेश काही महिन्यापूर्वी या दोन बालकांनी विद्युत करंट पासून तिघांचे प्राण वाचवल्याबद्दल त्यांचा माननीय एस. भुवनेश्वरी कलेक्टर मॅडम, माननीय जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी वाशिम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, माननीय खासदार संजय देशमुख, माननीय मंत्री महोदय प्रतापरावजी जाधव, माननीय खासदार अनुप धोत्रे, माननीय विधान परिषद आमदार तथा शिवसेना नेत्या, विदर्भ कन्या भावनाताई गवळी,मराठा सेवा संघ आयोजित सत्कार सोहळ्यात माननीय पोलीस अधिकारी गंधे साहेब यासह अनेक स्वयंसेवी संस्था तथा राजकीय सामाजिक पदाधिकारी यांच्या मार्फत सन्मान केल्या गेलेली दोन बालकांपैकी चिरंजीव पुष्पक यांनी पुन्हा मालेगाव साठी मानाचा तुरा खोवण्याचे काम केले ते मालेगाव येथील विदर्भ पब्लिक स्कूल मध्ये नाव दाखल करून स्वतः रात्र-रात्र अभ्यास करून सी.बी.एस.ई.या केंद्रीय बोर्डातून वर्ग दहावी मध्ये मराठी,सोशल सायन्स व कॉम्प्युटर या विषयांमध्ये तब्बल 99 गुण तर गणित व सायन्स मध्ये 96 तर इंग्रजीमध्ये 93 गुण मिळवून एकूण 97.60 टक्के सर्वोत्कृष्ट व सर्वाधिक गुण प्राप्त करून माळी समाजामध्ये तथा मालेगाव नगरीमध्ये मानाचा तुरा खोवला आहे.

चिरंजीव पुष्पकला त्याची अपेक्षा विचारले असता भविष्यात पुढे आय.आय.टी.चे टॉपचे शिक्षण घ्यायचे असून त्या माध्यमातून देश सेवा करण्याचा माणस आमचे प्रतिनिधी कडे प्रतिक्रिया देताना व्यक्त केले.



विशेष म्हणजे. साध्य दैनिक उज्वल मालेगाव चे मुख्य संपादक अनिल बळी सर यांचे चिरंजीव पुष्पक बळी यांचे मालेगाव नगरीमध्ये सर्वत्र कौतुक होत आहे. साध्य दैनिक उज्वल मालेगाव पत्रकार तथा परिवारातर्फे पुष्पक आपणास पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा..

## पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा

### "सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या नढाळ येथील श्रीक्षेत्र पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. पनवेलचे मा.आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्या संकल्पनेतून जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पंचायतन मंदिर, नढाळ वाडी, चौक येथे १३ मे २०२२ रोजी या मंदिरांचा भव्यदिव्य असा प्राणप्रतिष्ठा सोहळा करून स्थापना करण्यात आली होती. श्री.मयुरेश्वर गणेश, संकटमोचन श्री.हनुमान, श्री. साईबाबा, श्री.भवानी माता आणि नढाळेश्वर महादेव या पाच मंदीरांचे "भव्य-दिव्य" असे आध्यात्मिक संकुल उभारण्यात आले आहे. यावर्षी मंदिराचा तिसरा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात हरिपाठ, श्रीं ची पालखी मिरवणूक दिंडी सोहळा, संगीत भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष नामदार श्री.अण्णासाहेब बनसोडे, लोकनेते माजी खासदार श्री रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील, कृ.ऊ.बा.स. समिती सभापती नारायण शेठ घरत, भाजपा ज्येष्ठ नेते नंदकुमार पटवर्धन, खालापूर नगराध्यक्ष सौ.शिवानी जंगम, शेकाप खालापूर तालुका चिटणीस संतोष जंगम, माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.





"पायी दिंडी चालत जाणाऱ्या सर्व भक्तांसाठी सभागृहात राहण्याची मोफत सेवा देण्यात येते. भक्तांसाठी अत्यल्प दरात भक्त निवासाची व्यवस्था या ठिकाणी आहे. दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांना मोफत चहा-पाणी ही अन्न सेवा संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. सांप्रदायिक, भजन कीर्तन कार्यक्रमासाठी मोफत सभागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. शैक्षणिक सेवेच्या दृष्टीने परिसरातील हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मीडियम स्कूल मधून अत्यल्प दरात इंग्रजी माध्यमाची शिक्षण सेवा देण्यात येते. शाळेमध्ये पालक नसणाऱ्या आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण सेवा आणि आवश्यक ते सहकार्य अशाप्रकारे विविध सुविधा श्री क्षेत्र पंचायतन मंदिराच्या परिसरातून देण्यात येतात."

**- प्रितम जनार्दन म्हात्रे,**
**अध्यक्ष, जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था.**

## वाढोणा(बाजार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील लिपिकाची त्वरित हकालपट्टी करण्यात यावी

### मंत्री अशोक उईके यांनी नागरिकांच्या समस्याचे समाधान करावे




**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**जितेंद्र खोडे**

राळेगावः-प्राथमिक आरोग्य केंद्र वाढोणा (बाजार) येथे मागील काही दिवसात विविध प्रसार माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याचा व तसेच व फिल्टर काही महिन्यापासून बंद आहे अशा बातम्या खूप वेळा प्रकाशित झाल्या परंतु इतके दिवस होऊन ही प्रशासनाचे व तालुका अधिकारी यांनी एक वेळा पण प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली नाही व पाहणी केली नाही,तसेच तेथील कारभार हा वैद्यकीय अधिकारी न पाहता कनिष्ठ लिपिक हा पाहतात हे कसे काय?असा प्रश्न वाढोणा (बाजार) येथील नागरिकांच्या मनात येत आहे अशा अधिकार्याला एवढे माहीत असूनही तो न घाबरता तो जसे च्या तसेच त्याच्या मनात येईल तसे तो काम करत आहे याचा अर्थ प्रशासन हतबल आहे असा होते आणि नागरिकांची मागणी अशी आहे की अशा मुजोर लिपिकाची गावातून लवकरात लवकर हकालपट्टी करण्यात यावी जेणेकरून रुणांना पिण्याच्या पाणी व इतर सोयी सुविधा पासून वंचित रहावे लागणार नाही. तसेच मा.आमदार अशोक उईके यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन झालेले आहे, त्यामुळे त्यांनी या प्राथमिक आरोग्य केंद्रावर लक्ष केंद्रित करावे व योग्य त्या सुचना देऊन नागरिकांच्या समस्याचे समाधान करावे अशी मागणी होतांना दिसून येत आहे

नोटः-मी प्रत्येक वेळेस तालुका आरोग्य अधिकारी यांना लेखी तक्रार देऊन अद्याप काहीही सुधारणा सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात असमर्थ ठरली आहे...

**यु.ए.बरबटकर**
**वैद्यकीय अधिकारी**




**दैनिक युवक आधार -** अविनाशजी कोळी यांच्या कार्याची दखल घेत प्रदेश कार्यालयाने त्यांना पुन्हा एकदा भाजपा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष पदी निवड केली. याबद्दल त्यांना शुभेच्छा देताना पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १८ वतीने ओबीसी मोर्चा सोशल मीडिया सेल जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे,प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, प्रसाद म्हात्रे,नरेंद्र सोनवणे, सुधीर देसाई, चंद्रकांत पाटील.



संघटन कौशल्य, कार्यक्षमता व पक्षशिस्त म्हणून सुपरिचित असलेले अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

( छाया दैनिक युवक आधार)

## मोतीलाल कोठारी विद्यालयाची, कु.सबा समीर सय्यद दहावी बोर्ड परीक्षेत तृतीय

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**



– एस.एस.सी. (दहावी) बोर्ड परीक्षेत मोतीलाल कोठारी विद्यालय कडा ता.आष्टी, या शाळेतील विद्यार्थीनी कु.सबा समीर सय्यद हिने 97.60% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. तिला या साठी मोतीलाल कोठारी विद्यालय कडा या शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. कु.सबा सय्यद हिने आज पर्यंत शालेय शिक्षण घेत असताना अनेक राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय निबंध, भाषण स्पर्धेत पारितोषिक मिळवले आहे. तसेच तिचे आकाशवाणी केंद्र बीड येथे भाषणाचे प्रसारण झालेले आहे. कु.सबाला जिल्हास्तरीय आदर्श गुणवंत विद्यार्थीनी हा पुरस्कार देखील मिळालेला आहे. तसेच कु.सबा सय्यद पाचवी आणि आठवी स्कॉलरशिप धारक विद्यार्थिनी आहे. दहावीच्या परीक्षेतील यशासाठी कु.सबा सय्यद यांने केलेले कष्ट, जिद्द, चिकाटी आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन या मुळे तिला हे यश मिळाले. त्याच्या या यशासाठी तिचे मुख्याध्यापक शिकारे सर, प्रा.डॉ. जमीर सर, नईम भैय्या शेख, समीर सय्यद सर यांनी अभिनंदन केले आहे. व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# चिरनेर येथील ठकुबाई खारपाटील इंग्रजी माध्यम व

## परशुराम धाकू खारपाटील विद्यालयात दहावीच्या परीक्षेत मुलींची बाजी.

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल मंगळवार दि. 13 मे. रोजी ,1 :00 वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. यात उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी. पी .खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयातील मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी आणि ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून, यात इंग्रजी आणि मराठी माध्यमातून मुलींनीच बाजी मारली आहे. पी.पी. खारपाटील सोसायटीच्या संकुलनातील इंग्रजी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल शंभर टक्के लागला आहे. तर मराठी माध्यम विद्यालयाचा
शेकडा निकाल 94. 93 टक्के इतका लागला आहे. .या वेळीही ठकुबाई खारपाटील इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयाने आपली शंभर टक्के निकालाची सलग चार वर्षाची परंपरा कायम राखली असून, या इंग्रजी माध्यमाच्या संकुलनातून मानसी सागर जोशी हिने 91.60 टक्के गुण मिळवून, इंग्रजी माध्यम स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. सानवी संतोष मोकल हिने 91 टक्के गुण मिळवून द्वितीय आली. मोनिका संजय पडवळ हिने



90.60 टक्के गुण मिळवून तृतीय आली. चैतन्य प्रभाकर भोईर याने 89.40 टक्के गुण मिळवून चौथा आला. वैद्यही संदीप महाडिक हिने 89 टक्के गुण मिळून पाचवी आली.

मराठी माध्यमातून भूमिका काशिनाथ ठाकूर हिने 95.20 टक्के गुण मिळवून, शाळेत प्रथम येण्याचा मान पटकाविला. आहे. पायल रविंद्र पाटील हिने 90.20 टक्के गुण मिळवून शाळेत दुसरी आली. प्रेरणा दत्तात्रेय पाटील हिने 89.40% गुण मिळवून तिसरी आली श्रेया माणिक खारपाटील हिने 87.60% गुण मिळवून चौथी आली. प्रज्ञेश विजय म्हात्रे याने ८५.६० टक्के गुण मिळवून पाचवा आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष पी.पी.खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्रशेठ खारपाटील, चेअरमन समीर खारपाटील,सचिव सागर खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासकीय अधिकारी व्ही. ए.पाटील, प्राचार्य मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर , इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर , विद्या संकुलनाचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल मंगळवार दि. 13 मे. रोजी ,1 :00 वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. यात उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी. पी .खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयातील मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी आणि ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून, यात इंग्रजी आणि मराठी माध्यमातून मुलींनीच बाजी मारली आहे. पी.पी. खारपाटील सोसायटीच्या संकुलनातील इंग्रजी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल शंभर टक्के लागला आहे. तर मराठी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल 94. 93 टक्के इतका लागला आहे. .या वेळीही ठकुबाई खारपाटील इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयाने आपली शंभर टक्के निकालाची सलग चार वर्षाची परंपरा कायम राखली असून, या इंग्रजी माध्यमाच्या संकुलनातून मानसी सागर जोशी हिने 91.60 टक्के गुण मिळवून, इंग्रजी माध्यम स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. सानवी संतोष मोकल हिने 91 टक्के गुण मिळवून द्वितीय आली. मोनिका संजय पडवळ हिने 90.60 टक्के गुण मिळवून तृतीय आली. चैतन्य प्रभाकर भोईर याने 89.40 टक्के गुण मिळवून चौथा आला. वैद्यही संदीप महाडिक हिने 89 टक्के गुण मिळून पाचवी आली. मराठी माध्यमातून भूमिका काशिनाथ ठाकूर हिने 95.20 टक्के गुण मिळवून, शाळेत प्रथम येण्याचा मान पटकाविला. आहे. पायल रविंद्र पाटील हिने 90.20 टक्के गुण मिळवून शाळेत दुसरी आली. प्रेरणा दत्तात्रेय पाटील हिने 89.40% गुण मिळवून तिसरी आली श्रेया माणिक खारपाटील हिने 87.60% गुण मिळवून चौथी आली. प्रज्ञेश विजय म्हात्रे याने ८५.६० टक्के गुण मिळवून पाचवा आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष पी.पी.खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्रशेठ खारपाटील, चेअरमन समीर खारपाटील,सचिव सागर खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासकीय अधिकारी व्ही. ए.पाटील, प्राचार्य मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर , इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर , विद्या संकुलनाचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## स्मॉल वंडर हायस्कूल वडकी ची संस्कृती नारायण राजूरकर 93 टक्के घेत प्रथम




**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

वडकी:-दरवर्षी प्रमाणे यावर्षी स्मॉल वंडर हायस्कूलचा एस.एस. सी २०२४-२५ चा निकाल १०० टक्के लागला आहे.यात मुलींनी बाजी मारली असून वडकी सर्कल मधून संस्कृती नारायण राजूरकर ने ९३% घेतले.तसेच इंग्रजी विषयात ९३ गुण घेतले आहे.तर रिया अजय येरलेकरला ८९% टक्के मिळाले आहेत तर मराठी विषयात ९१ गुण भेटले आहेत .भावेश प्रताप भंडारी ८७% इतिहास विषयात ९२ गुण ,क्रिश राजू ताजनेला ८५% तर गणितात ९२ गुण भेटले आहेत.निकिता विनोद खंडळकर ८४ टक्के,श्रेया प्रवीण आष्टकार ८३% संजिवनी किशोर कुंभालकर ८३% गुण घेतले आहेत.दीक्षा गजानन फरकाडे ८१.४०%भेटले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभिनंदन करीत शाळेचा मुख्याध्यापिका डॉ. मंजुषा दौ.सागर यांनी शिक्षक तसेच पालकांना अभिनंदन केले. तसेच विषय शिक्षक अहमद शेख,शंकर मालखेडे,विजय फुलकर शंननो शेख,वैभव करडे, अश्विनी तुराळे. यांचेही अथक परिश्रम बद्दल आभार करण्यात आले. निता फुटाणे. योगिनी भोयर.अक्षय वानखेडे सर्व शिक्षकांनी आनंद व्यक्त केला.गावात विद्यार्थ्यांच्या परीक्षा निकालाने उत्साह दिसून येत आहे.उद्या शाळेत विद्यार्थी पालक शिक्षक यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला आहे

## लखाजी महाराज विद्यालय झाडगावची विद्यार्थींनी श्रेया शिंदे पहीली तर प्रतिक्षा राठोड दुसरी तर अभिजित राऊत तिसरा




**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** नुकताच दहावीचा आँनलाईन निकाल घोषित झाला असून राळेगाव तालुक्यातील झाडगाव येथील श्री लखाजी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे नव्यान्नव विद्यार्थी झाडगाव केंद्रावर परीक्षेला बसले होते त्यापैकी आठ विद्यार्थी प्राविण्यसहित आठ विद्यार्थी पास झाले तर प्रथम श्रेणीत पंचेचाळीस विद्यार्थी पास झाले असून प्रथम क्रमांक कु.श्रेया अमोल शिंदे,दुसरा क्रमांक प्रतिक्षा सोमनाथ राठोड ,तिसरा क्रमांक अभिजित गणेश राऊत,चौथा क्रमांक मंजूषा हनुमान शिवरकर,तर गौरी मारोतराव पांडे हिचा पाचवा क्रमांक ,असा असून या निकालासाठी वर्ग शिक्षक,विषय शिक्षक यांनी अथक परिश्रम घेतले असून या विजयी विद्यार्थी बंधू भगिनींचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष दिलीप कोल्हे उपाध्यक्ष आशिष कोल्हे सचिव रोशन कोल्हे संचालक जेष्ठ संचालक चित्तरंजन कोल्हे,शेखर झाडे,भरत पाल,गुलाबराव महाजन,दिलीप देशपांडे,सुरेश गंधेवार सरोजताई कोल्हे तसेच विद्यालयाचे प्राचार्य विलास निमरड,जेष्ठ शिक्षक रमेश टेंभेंकर,दिगांबर बातुलवार राजेश भोयर,रंजय चौधरी,मोहन आत्राम मोहन बोरकर,विशाल मस्के,राहुल तुळणकर,अंकित कंधारकर ,सौ कुंदा काळे,वंदना अरविंदराव वाढोणकर, वैशाली सातारकर,पौर्णिमा एन्नावर,नयन पेंदे,अश्विनी तिजारे, आरती कनकुलवार तथा शिक्षकेतर कर्मचारी वाल्मिक कोल्हे,पवन गिरी, शुभम मेश्राम,बाबुलाल येसंबरे,विनोद शेलवटे सह अनेक मान्यवर मंडळींनी अभिनंदन केले आहे.

# छत्रपती संभाजीराजेंच्या स्मारकासह महापुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत अनास्था...

## ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करूनही जिल्हा परिषदेतील काम रखडले, छत्रपती संभाजीराजे जयंती दिनी धरणे आंदोलन...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराजांसह विविध महापुरुषांचे पुतळे उभारणीबाबत १५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेचा ठराव झाला. या साठी आंदोलने आणि उपोषणेही झाली. नवीन इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजीराजांचे स्मारक आणि इतर राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याची घोषणा जिल्हा परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी केली. विशेष म्हणजे तत्कालीन पालकमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांनी १९ मार्च २०२२ रोजी पुतळे उभारणीच्या कामाचे भूमिपूजन झाले. परंतु तीन वर्षापासून अद्याप कामाला सुरुवातच झाली नाही. ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करून मागणी करणारे आणि घोषणा करणारे सत्तेत असुन तातडीने स्मारकांचे काम पूर्ण करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी दि.१४ मे बुधवार छत्रपती संभाजीराजे जयंती दिनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या आवारात धरणे आंदोलन करण्यात




येऊन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. या वेळी आंदोलनात विभागीय अध्यक्ष संभाजी ब्रिगेड राहुल वायकर, मराठासेवक संजय गोडसे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय छावा संघटना युवराज मस्के, बीड जिल्हाध्यक्ष बुलंद छावा संघटना विठ्ठल बहिर, मराठा सेवक अशोक सुरवसे, राहुल कवठेकर, शेख मुबीन, रामनाथ खोड, पांडुरंग हराळे, रामकिसन कदम, किशोर निर्मळ, अंगद मांडवे, शाकींदर काटकर, मुरलीधर काटकर सह आदी सहभागी होते. कार्यकारी अभियंता बां. वि.क्र.१ जि.प.बीड मोमीन सय्यद शकील सय्यद यांनी आंदोलन स्थळी चर्चा करून सदरील महापुरूषांचे पुतळे बांधण्याकरीता चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नातुन

**मागणी आणि घोषणा करणारे सत्तेत**

महापुरुषांसह लोकनेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत. दि.१९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष बजरंग सोनवणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाइन उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपूजनही पार पडले. तेव्हाही सत्तेत असलेले मंडळी आत्ताही सत्तेत आहेत. मात्र महापुरुषांच्या पुतळ्या बाबत सरकारला अनास्था का ? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

तरतूद ५० लक्ष रुपये इतकी करण्यात आली असुन सदरील ईमारतीचे संरक्षण भिंत बांधकाम पूर्ण झाल्या नंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले. या विषयी अधिक माहिती अशी की जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच छत्रपती राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत २०१० साली झाला. त्या नंतर पुढे काहीच हालचाल झाली नाही. पुढे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे, दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळुंके, दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांच्या पुतळ्यांच्या उभारण्याची मागणी पुढे आली. त्या नंतर जिल्हा परिषदेचे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम सुरू झाले. नवीन प्रशासकीय इमारती समोर पुतळे उभारणीसाठी छत्रपती शंभू प्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. त्या वेळी तत्कालीन जिल्हा परिषद उपाध्यक्ष व विद्यमान खासदार बजरंग सोनवणे तत्कालीन सभापती जयसिंह सोळंके आदींनी नवीन इमारतीच्या आवारात पुतळे उभारण्याचे आश्वासने दिले होते.

### पुतळे उभारण्याच्या फायलीचा संथ प्रवास ; शासन, प्रशासन व लोकप्रतिनिधींना सोयरेसुतक नाही

जिल्हा परिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण करण्यापूर्वी अगोदर पुतळ्यांची उभारणी व नंतरच इमारतीत कारभार अशी भूमिका घेत शंभू प्रेमींनी आंदोलने केली होती. दि.१६ जानेवारी २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मावळ्यांच्या वेशभूषेत लक्ष्यवेधी आंदोलन केल्यानंतर तत्कालीन सिईओ अजित पवार यांनी चबुतऱ्यासाठी ५ लक्ष रुपये व फेब्रुवारी २०२३ अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असुन संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करून स्मारकांचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु पुढे काहीच हालचाल नाही. आज आंदोलन स्थळी कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ मोमीन सय्यद शकील अहमद यांनी जिल्हा परिषद बीड येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.शासन निर्णय क्र. जिपई-२०२२/पत्र.क्र.१०/बां.-४ बांधकाम भवन मुंबई दि.२४/०२/२०२५ अन्वये अंदाजपत्रके रक्कम ३५, ५७, ५७, ५२२ मंजुरी मिळाली असुन सदरील इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाकरिता clause ३५ नुसार मा.अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ धाराशिव यांची मंजुरी घेऊन पुढील काम करण्यात येईल. व तसेच सदरील महापुरुषांचे पुतळे बांधण्याकरीता चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नामधून तरतूद ५० लक्ष ईतकी करण्यात आलेली आहे. तरी सदर इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढे ती योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लेखी दिले आहे. त्यामुळे एकंदरीतच पुतळे उभारण्याच्या फायलीचा प्रवास संथ असुन शासन आणि प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यापैकी कोणालाही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येते.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**सामाजिक कार्यकर्ते**

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची भामट्याने केली 1 कोटी 5 लाखाची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

खारघर येथे राहणाऱ्या सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची भामट्यांनी तब्बल एक कोटी पाच लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक केली. खारघर येथील सेक्टर 20 मधील ट्विन्स सोसायटीमध्ये 64 वर्षांचे जेष्ठ नागरिक राहतात. ते एका खासगी कंपनीच्या उपाध्यक्ष या पदावरुन सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी आयुष्यभरात कमावलेली रक्कम बँक खात्यात जपून ठेवली होती. संबंधित ज्येष्ठाला शेअर्स ट्रेडिंगमधून जास्तीचा नफा मिळवून देतो असे आमिष दाखवून विविध बँक खात्यात रक्कम गुंतविण्यास सांगितले. त्यांनी बँकेत जमा केलेली रक्कम भामट्यांनी तयार केलेल्या बनावट संकेतस्थळावर दर्शविण्यात आली. परंतु ज्यावेळेस गुंतवलेली रक्कम काढण्यासाठी या जेष्ठ नागरिकाने प्रयत्न केला त्यावेळी ती रक्कम परत मिळाली नाही. नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## घरफोडीत लाखोचा ऐवज लंपास

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका सोसायटीमधील एका घराच्या दाराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरातील साडेतीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रकम चोरून नेल्याची घटना घडली. श्रीकांत पाटेकर हे न्यू राजहंस सोसायटी, आदई येथे राहतात. ते दरवाजाला कुलूप लावून कामा निमित्त बाहेर गेले होते. ही संधी साधत चोराने त्यांच्या घरात प्रवेश करून तेथून 30 ग्राम वजनाचे सोन्याचे दागिने आणि एक लाख दहा हजार रुपये चोरून नेले. पाटेकर हे काम आटपून घरी परतले असता घरात चोरी झाल्याचे त्यांना आढळले. त्यावर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे.

## पैशांसह सोन्याची चेन, मोबाईलची अज्ञात केली चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

खारघर टोल नाक्याच्या मागे पुणे-मुंबई लेनवरील नाल्याच्या मागे दुचाकीवर झोपलेल्या 30 वर्षीय तरुणाच्या खिशातून मोबाईल, सोन्याची चेन आणि पैशांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी चोरट्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सिद्धेश रेशीम हा सेक्टर-15 खारघर येथे राहत असून, तो मेकॅनिक आहे. तो खारघर टोल नाक्याच्या मागे पुणे-मुंबई लेनवरील नाल्याच्या मागे दुचाकीवर झोपला होता. त्यानंतर पहाटे 4.30 च्या सुमारास पोलिसांनी त्याला उठवले. या वेळी त्याने खिशात पाहिले असता, मोबाईल दिसून आला नाही. तसेच गळ्यातील सोन्याची चेन आणि पॉकेटमधील तीन हजार रुपये नसल्याचे लक्षात आले. त्यावर त्याने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे.

## खारघरमध्ये स्कुटीच्या वादातून हत्या; दोघांना अटक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

कॅटरर्सकडे काम करणाऱ्या कामगारांमध्ये क्षुल्लक कारणांवरून झालेल्या वादाची ठिणगी पडली आणि एकाला जीवे मारण्यात आले आहे. खारघर पोलिसांनी तातडीने हालचाल करून दोघांना ताब्यात घेतले.
ओवे कॅम्प येथील भोईर चाळीत राहणाऱ्या सोनुकुमार उर्फ सोनू महेंद्रकुमार यादव, सुग्रीम उर्फ सुरज चौधरी निशाद हे कैंटरर्स जगदीश बुटोलिया यांच्याकडे मजुरीचे काम करित होते. त्यांचा तिसरा सहकारी करणकुमार सुद्धा कामाला होता. सोनुकुमार याच्या घरी काल, तिघे एकत्र आले असताना, मालक बुटोलिया यांच्या मालकीची असलेली स्कुटी कुणी चालवायची यावरून वाद झाला. वाद विकोपाला गेला. सुग्रीम आणि सुरज यांनी लाकडी दांडूक्याने करण याच्या डोक्यात क्रूरपणे प्रहार करून करणला गंभीर जखमी केले. दोघांनीही त्याच्या डोक्यात आणि शरीरावर हल्ला चढविल्यानंतर जखमी अवस्थेत शेजाऱ्यांनी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. उपचार सुरु असताना करणकुमार उर्फ करण (वय 25) याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक राजपूत, खारघर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दीपक सुर्वे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) शितल पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस पथकाने घटनास्थळावरून दोन लाकडी दांडे आणि लोखंडी फावडे हस्तगत केले आहेत. शिवाय रक्ताचे नमुने आणि इतर पुरावे गोळा केले आहेत. दोन्ही आरोपींना पळून जाण्यापूर्वीच ताब्यात घेतले आहेत. ते मूळचे उत्तर प्रदेशातील आहेत. ही हत्या मालकाच्या स्कुटीवरून झाली असली तरी याचा उलगडा तपासाअंती होऊ शकते, असे संकेत मानले जात आहेत.

## शिवसेना उपनेते व संस्थेचे चेअरमन बबनदादा पाटील यांच्या चारही शाळेचा 10 वी चा निकाल 100%

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, इतर पान**



शिवसेना उपनेते व कमळ गौरी हिरु पाटील शिक्षण संस्था तळोजाचे चेअरमन बबनदादा पाटील यांच्या चारही शाळांचा निकाल 100% लागल्याने पालकांसह विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.
यामध्ये द इलाईट पब्लिक स्कूल (सीबीएसई बोर्ड ), द इलाईट पब्लिक स्कूल ( स्टेट बोर्ड), कै.कमळ पाटील माध्यमिक विद्यालय, अनुसया बबनदादा पाटील माध्यमिक विद्यालय या शाळांचा यंदाचा 10 वी चा निकाल 100% लागल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचे चेअरमन बबन दादा पाटील यांनी अभिनंदन अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जागतिक मातृदिन" निमित्ताने नाशिक मध्ये राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

नाशिक येथील पुष्परत्न बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी,नाशिक यांच्या वतीने रविवार दि.११मे २०२५ रोजी संध्याकाळी ५वा. लायन्स क्लब सभागृह,पंडित कॉलनी नाशिक येथे *जागतिक मातृदिना निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटक संगिता निकम (डि.वाय.एस.पी- कमिशनर ऑफीस,नाशिक)
कार्यक्रमाचे अध्यक्ष,
मा.डॉ.संजीव सोनवणे ( कुलगुरु- यशवंतराव चव्हाण,महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक)
प्रमुख पाहुणे,
सुषमाताई देसले पाटील ( अंमळनेर)




वासुदेव देसले साहेब
डि.वा.एस.पी.नाशिक ग्रामिण
विजय नामदेव भंदुरे
उपस्थित होते.
सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महामातांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.त्यानंतर
कार्यक्रमाचे आयोजक
प्रा.डॉ.आनंद आहिरे
यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत मानचिन्ह व सन्मानपत्र देवून करण्यात आले.
कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.डॉ. आनंद आहिरे यांनी सांगितले की,सर्वांच्या जीवनात आईला अनन्यसाधारण महत्व आहे.महाराष्ट्रातील विविध भागातील मातांचा व त्यांनी स्व कष्टातून घडविलेला मुलगा व मुलीचा हा सन्मान सोहळा आहे. पुष्परत्न बहुउद्देशिय सेवाभावी संस्था नेहमीच विविध आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार आयोजित करत असते.
कुलगुरु डॉ.सजीव सोनावणे यांनी सांगितले की,संपुर्ण जगाची उत्पत्ती ही आई पासून झालेली आहे.पुष्परत्न संस्थेला नेहमीच कौतुकाची थाप देत राहू.
डि.वाय.एस.पी.संगीता निकम यांनी आई ही खुप महान आहे तिला व्यक्त करता येत नाही. तर डि.वाय.एस.पी. वासुदेव देसले यांनी प्रतिपादन करतांना असे म्हटले की,जगातील सर्व माता वंदनीय आहे. प्रत्येक आईची भावना,ममत्व हे शब्दात वर्णन करता येणार नाही.प्रत्येकांनी आपले विचार मांडले.व प्रा.डॉ.आनंद आहिरे यांचे अभिनंदन व कौतुक केले. मान्यवरांच्या हस्ते माता व त्यांचे सुपुत्र व कन्यारत्नांचा राज्यस्तरीय मातृवात्सल्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले .दगडू लोमटे अंबाजोगाई यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.शेवटी उपस्थित सर्वांचे आभार .धनंजय चतुर यांनी मानले.

## वेशवी येथे विवाह सोहळ्याप्रसंगी विविध कार्यक्रम संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी/हेमाली पाटील**



स्व. संगीतकार चिमाजी बुवा मुंबईकर वं स्व. चिमू बाई चिमाजी मुंबईकर वं ह.भ.प.नाट्य संस्थापक अंबाजी बुवा मुंबईकर यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन. कै. सौ. रुक्मिणी वं त्रिंबकशेठ चिमाजी मुंबईकर यांचे नातू. कै. सौ. महादीबाई लक्ष्मण वं लक्ष्मण ठाकूर यांचे नातू सौ. अहिल्या निशिकांत त्रिंबक चिमाजी मुंबई कर यांचा मुलगा रितेश वं पंढरीनाथ वामन पाटील वशेणी यांची मुलगी जुईली व सौ. अहिल्या निशिकांत मुंबई कर यांचा मुलगा धीरज व प्रभाकर कचेर पाटील यांची मुलगी धनश्री यांचा शुभ विवाह नुकताच संपन्न झाला. यावेळी विविध राजकीय पक्षीय नेते यांनी हजेरी लावून वधू वरांस शुभाशीर्वाद दिले. या विवाह प्रित्यर्थ वेश्वी येथे श्री सत्यनारायण महापुजे चे आयोजन करून करून विविध कार्यक्रम संपन्न झाले. श्री हनुमान प्रासादिक महिला हरिपाठ अलिबाग -प्रमुख मार्गदर्शक ह भ प.अमित महाराज म्हात्रे (अध्यक्षकोकण विभाग वारकरी मंडळ), यांचे हरिपाठ संपन्न झाला. यावेळी प्रभाकर कचेर पाटील यांनी त्यांची मुलगी धनश्री धीरज मुंबईकर यांच्या शुभ लग्न गौरवार्थ हरिपाठ मंडळा स एकवीस हजाराची देणगी देण्यात आली.तर कार्यक्रमाची सांगता कीर्तनकार अर्चना ताई गिरी मु. पो. राहूरी यांच्या सुश्राव्य कीर्तनाने झाली. यावेळी ऍड. सौ. मानसी म्हात्रे (माजी नगराध्यक्ष अलिबाग), ऍड. संतोष म्हात्रे. ऍड. पी. एन. पाटील, सुनिल शेठ पाटील (उधोजक), ऍड. संतोष पाटील, डॉ. सुभाष घरत, शेखर घरत, हभप. एकनाथ महाराज पाटील, शंकर राव कडू, सदाशिव मुंबईकर, मोहन बुवा पाटील, हभप जनार्दन महाराज, दिगंबर बुवा कडू,पुरुषोत्तम मुंबईकर (शिल्पकार)प्रकाश शेठ मुंबई कर (उधोजक),संतोष मुंबईकर, नामदेवशेठ पाटील (माजी सरपंच ), बरेंद्र मुंबईकर (माजी सरपंच ), शामशेठ मुंबईकर (माजी सरपंच) आदी सह शारदा मुंबईकर यमुना मुंबईकर, पुष्पलता मुंबईकर, हिराबाई गावडे, हभप निरा म्हात्रे, हभप ज्योती पाटील, अनुसया मुंबईकर, सुमती मुंबईकर, उर्मिला मुंबईकर, नामूबाई कडू, सौ. गीता पाटील (माजी सरपंच ), चांगुणा पाटील, शारदा पाटील, कल्पना मुंबईकर मीनाक्षी मुंबईकर, अहिल्या मुंबईकर स्वेता मुंबईकर, सुनंदा, मुंबईकर, निर्मला मुंबईकर, गुलाब ताई मुंबईकर, सौ. सुमती रमेश पाटील, सौ.सुनीता भगवान पाटील, सौ.नीलम सचिन पाटील आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे शानदार निवेदन रायगड भूषण जयदास ठाकूर यांनी केले.

## खालापुरात आपत्ती व्यवस्थापन विषयाचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न.



**दैनिक युवक आधार**
**खालापूर /वार्ताहर**

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड अलिबाग यांनी उपनियंत्रक नागरी संरक्षण दल उरण यांचे पथकामार्फत खालापूर तालुक्यात दि. 14.मे रोजी आपत्ती व्यवस्थापन विषयाचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन सरनौबत नेताजी पालकर सभागृह येथे आयोजित केले होते. या शिबिराचे उद्घाटन खालापूर तालुक्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांचे हस्ते झाले तर प्रास्ताविक नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी केले. नागरी संरक्षण दल उरणचे प्रशिक्षक शशिकांत शिरसाट यांनी शिबिरार्थींना युद्धजन्य परिस्थितीत कोणकोणत्या उपाययोजना राबवाव्यात याबाबतीत तंत्रशुद्ध मार्गदर्शन करताना दृकश्राव्य प्रणालीचा वापर केला. आपत्तीचे विविध प्रकार विस्तृतपणे समजावून सांगताना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. प्रथमोपचार आणि कोणत्या प्रसंगी कसे मदतकार्य करायचे याबाबतीत प्रशिक्षणार्थींना सहभागी करून मार्गदर्शन केले. कोणत्याही आपत्तीला सामोरे जाण्यासाठी मनाच्या तयारी सोबत तांत्रिक बाबींचे ज्ञान असणे आवश्यक असल्याने अशा शिबिराचे आयोजन केल्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी या शिबिरानंतर शिबिरार्थींची सामाजिक जबाबदारी वाढली असल्याची जाणीव करून दिली. खालापूर तालुक्यातील महसूल कर्मचारी, खोपोली नगर परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी, खोपोली नगरपालिका फायर ब्रिगेडचे सदस्य, तालुक्यातील पोलीस पाटील, आपदा मित्र आणि सखी, हेल्प फाउंडेशनचे पदाधिकारी यांनी या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला. विविध संसाधनांचे प्रदर्शन आणि वापर याबद्दल मार्गदर्शन केले गेले.

# पक्षी वाचवा निसर्ग वाचवा

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

आपण राहत असलेल्या परिसरातील जैव साखळीतील महत्त्वाचा घटक म्हणजे पक्षी या पक्ष्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर घटत आहे. विशेषतः सहजपणे दिसणाऱ्या चिमण्या व अनेक सामान्य पक्षी शहरी भागामध्ये अनेक कारणांनी नष्ट होत आहेत. जसे की साधी घरे नष्ट करून त्याऐवजी सिमेंटची घरे उभारणे, मोबाईल टॉवर्स, वृक्षतोड, अवकाळी पाऊस, गारपीट, प्रतिकूल हवामान, नैसर्गिक अधिवास नष्ट करणे, ऋतुचक्रातील बदल, वाढते ध्वनी व वायू प्रदूषण, तप्त उन्हाळा इत्यादी. अशा परिस्थितीमध्ये आपण या मुक्या सजीवांबदल संवेदनशीलता व जिव्हाळा राखत त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी अतिशय सोपे पण महत्त्वपूर्ण प्रयत्न करूया. भर उन्हाळ्यात पक्ष्यांना पुरेसे पाणी भरलेली मातीची भांडी घराच्या छतावर, बाल्कनीत, अंगणात तसेच झाडांवर लावून ठेवता येतील त्याच बरोबर



अन्नधान्याने (बाजरी तांदूळ) भरलेला ट्रे, ग्रेन फीडर्स लावता येतील. पक्ष्यांसाठी मातीची अथवा लाकडाची कृत्रिम घरटी लावणे शक्य आहे. उष्माघातामुळे अस्वस्थ पक्षी किंवा जखमी असहाय्य पक्ष्यांवर प्रथमोपचार करता येईल. अशारीतीने निसर्गातील या सुंदर, आकर्षक, रंगीबिरंगी, आपल्या सर्वांना उपयुक्त अश्या वसुंधरेच्या

**अलंकाराचे जतन करूया, संवर्धन करू या.**

गेली पाच वर्षापासून भागिनाथ आसने हे पक्षांसाठी टू इन वन बर्ड फिडर भरून ठेवणे तसेच वाटप करणे,मातीचे जलपात्र भरून ठेवणे,वाटप करणे गाय गोठा मध्ये नियमित दोन बर्ड फिडर भरून ठेवलेले असतात. प्लास्टिकचे जलपात्र प्लास्टिकचे दाणेपात्र आणि सहा मातीची घरटी गोठ्यामध्ये बसवलेली आहे. घरासमोरील आंब्याच्या झाडाला मातीचे जलपात्र,एक टू इन वन बर्ड फिडर तसेच एक प्लास्टिकचे जलपात्र बसवलेले आहे प्लास्टिकच्या जलपात्रावर सावली असल्यास पाणी गरम होत नाही आणि पक्षी पाणी पितात असे आसने सांगतात. आपणही आपल्या परीने हे अभियान आपल्या गावी राबवावे अशी नम्र अपेक्षा. 'मिळून सारे जण, करुया द्विजगण रक्षण'

## शिळफाटा येथील रस्ता रुंदीकरणासाठी "आप"ने पुकारले उपोषणाचे हत्यार

### 15 मे रोजी बसणार उपोषणाला : डॉ पठाण

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**



खोपोली शिळफाटा येथील आरे डेरी ते गाझी बाबा दर्गा पर्यंत मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 अतिशय अरुंद असल्याकारणाने खूप जास्त प्रमाणात अपघात होत असतात व दररोज वाहतूक कोंडी होत असते त्यामुळे तेथील रहिवाशांना व दुकानदारांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. आम आदमी पार्टी तर्फे सदर रस्ता रुंदीकरणासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याबरोबर वारंवार बैठका व पत्र व्यवहार करून सुद्धा सदर रस्ता रुंदीकरणाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. सदर रस्ता लवकरात लवकर रुंदीकरण व्हावा व प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता आम आदमी पार्टी खोपोली शहर अध्यक्ष ग्यासुद्दीन खान, खोपोली शहर उपाध्यक्ष विवेक वाघमारे, खोपोली शहर सचिव चंद्रप्रकाश उपाध्याय व इतर पदाधिकारी गुरुवार दिनांक 15 मे 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता खोपोली शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करणार आहोत व सदर रस्ता लवकरात लवकर रुंदीकरण सुरू न झाल्यास आमरण उपोषण करू असे डॉ. पठाण यांनी सांगितले.

## 48 वर्षांनी देशविदेशातील बाळपणीच्या मित्र मैत्रिणींची झाली भेट ; स्नेहसंमेलनात झाल्या जुन्या आठवणी जाग्या

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

सुधागड तालुक्यातील पाली येथील ग.वा. वडेर हायस्कूलच्या 1976-77 सालातील दहावी वर्गातील देशविदेशातील बाळपणीच्या मित्र मैत्रिणींची 48 वर्षांनी स्नेहसंमेलननिमित्त झालेल्या भेटीत जुन्या आठवणी जाग्या झाल्या. सदरील स्नेहसंमेलनात देश, विदेशातून आलेले हेमा शहा (अमेरिका), अलका कोठारी (अहमदाबाद), मीना खिवंसरा (मालेगाव), डॉ.ज्योती पुरोहित (सदलगा- कर्नाटक), अशोक शिराळे (खोपोली), अंजली वैशंपायन (अंबरनाथ), सुचेता सुळे, अरुण खेरटकर (ठाणे), सुधीर देशमुख (डोंबिवली), नयना शहा (मालाड), ईला शहा (दहिसर), नरेंद कोठारी (मुंबई), ज्योती देशमुख, नीता चिटणीस, राजेंद्र ठोंबरे (पनवेल), संजय हजारे (पेण),पाली येथील अमृत भंडारी, सुभाष राठोड, गिरीष शिंदे, श्रीनिवास मोरे, शरद गोळे, प्रदीप उपाध्ये, नाना मराठे, नंदकुमार वाळंज, उत्तम ओसवाल, गजानन जोशी, पद्माकर काटकर उपस्थित असल्याची माहिती गजानन जोशी यांनी दिली.
पाली – उन्हेरे येथील डिस्कव्हर रिसॉर्ट येथे 6 व 7 मे रोजी आयोजन डॉ.राजन सोनकर व डॉ.ज्योती पुरोहित यांच्या मार्गदर्शना खाली पार पडलेल्या या स्नेहसंमेलनात बालपणीच्या जुन्या वर्ग मित्र-मैत्रिणीं 48 वर्षांनी वयाच्या अंदाजे 63 व्या वर्षी होणाऱ्या भेटीसाठी सर्वच आतूर झाले




होतेच शिवाय पुनः भेटीची अनिवार ओढ, इच्छा मनात ठेऊन देश व परदेशातून आलेल्या सर्वांना भेटीचा आनंदमय सुखद अनुभव घेता आला. सर्वांची नव्याने परिचय,कौटुंबिक व इतर माहिती झाल्यानंतर सर्वांचे गुलाबपुष्पाने स्वागत करण्यात आले.त्यानंतर सुरू झाल्या जुन्या आठवणी, मनमोकळेपणांनी गप्पा गोष्टी,मस्ती आणि धमाल करीत खेळीमेळीचे वातावरण निर्माण होत संध्याकाळ कधी झाली कुणास समजलेच नाही.रात्री सहभोजनानंतर सर्व जणांनी वर्गातील आठवणींना उधाण देत अनेकांनी कविता, किस्से, आणि एकमेकांच्या जुन्या आठवणी सांगताना मध्यरात्र कधी ओलांडून गेली ते कोणालाच समजले नाही. दुसऱ्या दिवशी सर्व जन शाळेत जाऊन आपण ज्या वर्ग खोलीत शिकलो त्याच वर्गात बसून जुन्या आठवणीना उजाळा देत शाळेतील एक आठवण या कार्यक्रमात आठवणी विषद करताना कोणी हसत तर कोणी गहिवरले व भावूक झालेले दिसत होते.सर्वांनी आपल्या भाषणात त्यावेळचे मुख्याध्यापक भावे सर तसेच सुळे सर, उपाध्ये सर, कुंटे सर, बढे सर, मराठे सर, लिमये सर, भणगे सर या सर्वांच्या आठवणीचा उल्लेख केला. शाळेतून रिसोर्टला आल्यावर सुरू झाल्या गप्पा-गोष्टी, दंगा मस्ती, गाणे-नाचणे या अत्यंत धमाल कार्यक्रमात सर्व रमून गेले. सरते शेवटी सर्वांना भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. दुपारी सहभोजना नंतर सर्वांनी पुन्हा भेटीचे एकमेकांना आश्वासन देत या अनमोल भेटीच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आल्याची माहिती गजानन जोशी यांनी दिली.

## वैनतेय विद्यालयाचा एस एस सी बोर्डाचा निकाल ९७. ०१ टक्के

### ९९ % मार्क मार्क मिळवून दुर्वा सानप विद्यालयात प्रथम*

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड निफाड येथील वैनतेय विद्यालयाचा एस .एस. सी बोर्डाचा निकाल ९७. ०१ टक्के लागला असून या विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे दूर्वा गोरखनाथ सानप या विद्यार्थिनीला ९९ % मार्क मिळाले असून ती विद्यालयात प्रथम आली आहे या विद्यालयाचे ३६८ विद्यार्थी इयत्ता दहावीच्या परीक्षेत बसलेले होते. त्यापैकी ३५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. या विद्यालयाचे १९६ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, १०१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत ,४ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. विद्यालयाचे प्रथम ३ विद्यार्थी पुढील प्रमाणे प्रथम- दुर्वा गोरखनाथ सानप ( ९९ %), द्वितीय- वेदांत भास्कर खेलुकर -( ९७ % ) तृतीय - मंजिरी नंदकिशोर घोडेकर, (९६.६० %), चतुर्थ- आयुष संभाजी काकडे (९६. ४० %),पाचवी- अनिशा अनिल गोसावी (९६%) विद्यालयात या गुणवंत विद्यार्थ्यांचा न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त रतन पाटील वडघुले,मधुकर राऊत विश्वास कराड , वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी. आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले यांच्या उपस्थितीत



सत्कार करण्यात आला यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे संस्थेचे विश्वस्त अँड आप्पासाहेब उगांवकर , रतन पाटील वडघुले, किरण कापसे ,राजेंद्र राठी , अँड दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड ,नरेंद्र नांदे , वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी. आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले , पर्यवेक्षक बी. बी .गुंजाळ आदींनी कौतुक केले
फोटो - वैनतेय विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी उपस्थित संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले,मधुकर राऊत विश्वास कराड वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी. आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले आदी

## साडेतीन लाखांचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

मुख्य दरवाजाचा कोयंडा तोडून चोराने घरातील साडेतीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. श्रीकांत पाटेकर हे न्यू राजहंस सोसायटी, आदई येथे राहत असून त्यांनी दरवाजाला कुलूप लावले होते. चोराने त्यांच्या घरात प्रवेश करून 30 ग्राम वजनाचे सोन्याचे दागिने आणि एक लाख दहा हजार रुपये चोरून नेले.

## साडेचार गुंठे जागेचे पैसे घेऊन दीड गुंठे जागा कमी देऊन केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

साडेचार गुंठे जागेचे पैसे घेऊन प्रत्यक्षात साडेचार गुंठे जागा न देता दीड गुंठे जागा कमी देऊन फसवणूक केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विद्याधर हसू पाटील, शैलेंद्र ज्वाला प्रसाद माथुर, विनय रेवन बाबर पाटील, सुनील तुपे, भगवान म्हात्रे अशी त्यांची नावे आहेत. रामचंद्र साधुराम पाटील हे विचुंबे येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. भगवान म्हात्रे आणि विद्याधर पाटील यांनी विचुंबे येथील जागा शैलेंद्र माथुर व विनय पाटील यांची असून ते विकणार असल्याचे सांगितले. त्यावेळी रामचंद्र यांनी साडेचार गुंठे जागा घेण्यास होकार दिला. त्यानुसार त्यांनी साडेचार गुंठेचे पैसे विद्याधर पाटील यांना दिले. 2024 मध्ये त्यांची जागा बिल्डरला डेव्हलप करण्यास दिली असता ती साडेचार गुंठे नसल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी विद्याधर, विनय, भगवान यांना विचारले असता त्यांनी थातूरमातूर उत्तर दिले. त्यावेळी बिल्डरने जागा मोजणी केली असता दीड गुंठे कमी भरली. तेव्हा त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

## सात लाख 85 हजार रुपयांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

सीएनजी पंपाच्या कार्यालयातील कपाटातील तिजोरीत ठेवलेले सात लाख 85 हजार रुपयांची चोरी केल्याप्रकरणी मॅनेजर यशवंत वाल्मीक राव वाघ (राहणार रोडपाली, मूळ हिंगणघाट, वर्धा) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुनील ढाले यांचा रोडपाली सिग्नल येथे एमजीएल कंपनीचा सीएनजी पंप आहे. या पंपावर यशवंत वाघ मॅनेजर आहेत. सुनील ढाले पंपावर आले असता यशवंत कोठे आहे असे विचारले असता तो जेवण करण्यात गेले असल्याचे सांगितले. त्याची वाट पाहिली मात्र तो आला नाही. त्याला फोन केला असता त्याने फोन उचलले नाहीत. त्याच्या रूमवर गेला असता रूमला लॉक असल्याचे समजले. यावेळी ढाले यांनी कार्यालयाच्या कपाटातील तिजोरीत असलेली रक्कम तपासली असता रक्कम सापडून आली नाही. यावेळी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता वाघ यांनी तिजोरीतून दोन वेळा पैसे काढले आणि ते पैसे खिशात टाकून तो जाताना दिसून आला. पंपावरील विक्री झालेली सीएनजी आणि पैशांचा तपशील तपासला असता सात लाख 85 हजार रुपये कमी असल्याचे निदर्शनास आले. यशवंत वाघ यांनी सात लाख 85 हजाराची चोरी करून तो घेऊन गेला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास आहेत.

## झोपलेल्या ईसमाकडील मोबाईल, सोन्याची चैन आणि पैशांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: खारघर टोल नाक्याच्या मागे पुणे मुंबई लेनवरील नाल्याच्या मागे दुचाकी वर झोपलेल्या तीस वर्षीय तरुणाच्या खिशातून मोबाईल, सोन्याची चैन आणि पैशांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सिद्धेश रेशीम हा सेक्टर 15, खारघर येथे राहत असून तो मेकॅनिक आहे. आठ मे रोजी तो खारघर टोल नाक्याच्या मागे पुणे मुंबई लेनवरील नाल्याच्या मागे दुचाकी वर झोपला. त्यानंतर पहाटे ४:३० च्या सुमारास पोलिसांनी त्याला उठवले. यावेळी त्याने खिशात पाहिले असता मोबाईल दिसून आला नाही. तसेच गळ्यात सोन्याची चैन आणि पॉकेटमधील तीन हजार रुपये नसल्याचे लक्षात आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## टेरव सुमन विद्यालयातून आदित्य कदम ९२.८० टक्के गुण मिळवून प्रथम

**१०० टक्के निकाल**

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी) :**



जय भवानी एज्युकेशन सोसायटी संचलित सुमन विद्यालय, टेरव प्रशालेचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५ चा निकाल १०० टक्के लागला आहे. या परीक्षेत कुमार आदित्य गोपीचंद कदम याने ९२.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी सिद्धी अनंत कदम हिने ९२.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक तर कुमार समर्थ सुदेश साळवी याने ९१.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. सदर निकालामध्ये प्रशालेमधून एकूण ३१ विद्यार्थ्यांपैकी विशेष प्रावीण्य श्रेणीत १२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४ विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणीत ५ विद्यार्थी यांनी नेत्रदीपक यश मिळवले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे जय भवानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विकास कदम, सचिव योगेश कदम, खजिनदार अजित कदम तसेच संस्थेचे सर्व संचालक, सभासद, ग्रामस्थ, हितचिंतक व पालक यांच्या वतीने अभिनंदनचा वर्षाव करण्यात येत आहे.

# कळंबोली सर्कलवरील पनवेल एक्झीटच काम अंतीम टप्प्यात; लवकरच एक मार्ग वाहतुकीसाठी होणार खुला

### अखेर वाहन चालकांची वाहतूक कोंडीतून होणार सुटका !

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून कळंबोली जंक्शनची नव्याने सुधारणा करण्यात येत आहे. त्यासाठी कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे कळंबोली सर्कल येथे वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवरील पनवेल एग्झिट मंगळवार, ११ फेब्रुवारीपासून सहा महिन्यांपासून बंद ठेवण्यात आला आहे. सध्या येथील काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच वाहतुकीसाठी खुला होणार आहे. लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असून या पूर्वी रस्ते जोडणीचे काम आता जलदगतीने सुरू झाले आहे. कळंबोली जंक्शनवर होत असणाऱ्या वाहतूक कोंडीमधून



वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. सध्या हे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. खोदकाम करायला सुरवात केली असून सर्व यंत्रणा जलदगतीने कामाला लावली आहे. पुलाचे पायाभरणीचे काम सुरु असून जवळपास शंभर फाईल फाउंडेशन म्हणजेच स्तंभ झाल आहे.

दरम्यान, एनएचएआय आणि सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने, टीआयपीएल पनवेल यांच्या मार्फत हे काम सुरू आहे.

**वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून पनवेल, गोवा, जेएनपीटीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोनफाटा (किमी ९.६००) येथे डावीकडे वळण घेऊन एनएच ४८ मार्गावरून पळस्पे सर्कल येथून इच्छितस्थळी जाता येणार आहे. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून (पनेवल एग्झिट) येथून तळोजा, कल्याण - शिळफाट्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सरळ पनवेल-शीव महामार्गावरून पुरुषार्थ पेट्रोलपंप उड्डाणपुलाखालून उजवीकडे वळण घेऊन रोडपाली येथून एनएच ४८ महामार्गावरून इच्छितस्थळी जाता येणार आहे.

**काय होणार फायदे ?**

कळंबोली जंक्शन अपग्रेड करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्ते विकास महामंडळ नोडल एजन्सी असून याकरता केंद्रीय रस्ते विकास विभागाकडून 770 कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. यामुळे हे वाहतूक सिग्नल आणि ट्रॅफिक फ्री होणार आहे. त्यामुळे तासनतास वाहनांना अडकून पडावे लागणार नाही. क्रॉस कॉनफ्लेक्ट सुद्धा दूर होणार आहे. परिणामी वेळ आणि इंधन वाचणार आहे. तर माती परीक्षणाचे काम सुद्धा युद्ध पातळीवर सुरू आहे. या व्यतिरिक्त कामामध्ये कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी सहा महिन्यांसाठी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पनवेल एक्झिट बंद करण्यात आली आहे. भूमिपुजनानंतर कामाला बराच उशीर झाला पण अखेर कामाला सुरवात झाली असून नवी मुंबईची स्वागतकमान असणाऱ्या या कळंबोली जंक्शनचे रूपडे पालटणार आहे. याची डिझाईन पाहता होणारी ट्रॅफिक समस्येचा तिढा सुटणार आहे..

## दादासाहेब फाळके चित्रपट युनियनची कामगार व कलाकारांसाठी शटल सेवा सुरु करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई, 13 मे 2025 : दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या वतीने चित्रनगरीतील कामगार व कलाकारांसाठी सुरक्षित वाहतूक सुविधेसाठी शटल सेवा सुरु करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे ऑल इंडिया प्रेसिडेंट श्री. अजित महामुन्कर यांच्या आदेशानुसार युनियनच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अड. आशिष शेलार यांची मंत्रालयात भेट घेतली. या भेटीत चित्रनगरीत दररोज चित्रीकरणासाठी येणाऱ्या हजारो टेक्निशियन, जूनियर आर्टिस्ट, महिला कर्मचारी व कामगारांना सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शटल सेवा उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन देण्यात आले. विशेषतः पावसाळी हवामान, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अभाव व रात्रीच्या वेळेस सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन ही मागणी करण्यात आली आहे.



शिष्टमंडळाने पुढील मागण्या मांडल्या : 1. दैनंदिन शटल सेवा चित्रनगरीत सुरू करावी. 2. १५-२० मिनिटांच्या अंतराने शटल सेवा चालवावी. 3. कामगार व महिलांना अत्यल्प दरात ही सेवा द्यावी.
4. सुरक्षेसाठी वाहनांत CCTV व सुरक्षा कर्मचारी नियुक्त करावेत. यावेळी युनियनचे मुंबई अध्यक्ष श्री. देवेंद्र पंडित व दक्षिण मुंबई अध्यक्ष श्री. विद्याधर श्रीयर बने उपस्थित होते. मंत्रिमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत याबाबत लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

## दृष्टी बाधित =अंध=असल तरी जीवनाच्या प्रत्येक श्वासात जगण्याची ईच्छा असावी.मधु तारा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**



दिनांक 14 मे 2025 रोजी पुणे हडपसर येथील दृष्टी बाधित असलेले मधु तारा सोबती श्री योगेशजी पांढरे यांच्या नवीन व्यवसायासाठी उभारलेल्या दुकानाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या वेळी योगेश पांढरे यांच्या जन्मदाते वडील यांच्या हसते नारळ फोडून आणि मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे.दिव्यांग आधार संस्थेचे दृष्टी बाधित श्री दादा आल्हाट.दिव्यांग श्री कासमभाई पठाण आणि मान्यवरांच्या हस्ते रिबीन कट करून उद्घाटन करण्यात आले.
या प्रसंगी शुभेच्छा देताना मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी श्री योगेश पांढरे यांचे कौतुक करत जीवनात येणाऱ्या अडचणीवर मात करून स्वतःला सिद्ध करून दाखवणाऱ्या पैकी श्री योगेश पांढरे आहेत. व्यवसायच नाही तर मधु तारा सोबत अनेक दिव्यांगांच्या कार्यासाठी ही त्यांचा मोलाचा सहभाग असतो. त्यांच सामाजिक कार्य खूप मोठ आहे आणि नेहमी ते दिव्यांगांसाठी निःस्वार्थ पणाने उभे असतात.मधु तारा* *फाऊंडेशन नेहमीच श्री योगेश पांढरे यांच्या सोबत आहे असे म्हणत त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच आपल्याला या जीवनातल्या महत्वाच्या क्षणाच्या आनंद सोहळ्याचं निमंत्रण दिल्या बद्दल आभार व्यक्त केले. *या वेळी अनेक मान्यवरांनी श्री योगेश पांढरे यांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.या वेळी पांढरे परिवार.त्यांचे नातेवाईक.परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.*

## भाजपा उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी सतीश मोरे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण (प्रतिनिधी):--**



गेल्या महिनाभरापूर्वी भाजपा चिपळूण ग्रामीण व शहर मंडळ अध्यक्ष निवडी जाहीर करण्यात आल्या. तर आता भाजपा उत्तर व दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी चिपळूण कापसाळ येथील सतीश मोरे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल श्री. मोरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गेल्या महिन्याभरापासून महाराष्ट्रात भाजप पक्ष संघटनेत बदल होत आहेत. यानुसार गेल्या महिन्याभरापूर्वी भाजपा चिपळूण ग्रामीण मंडळ अध्यक्षपदी खेर्डी येथील विनोद भुरण तर शहर मंडल अध्यक्षपदी शशिकांत मोदी यांची निवड करण्यात आली. तर आता संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर केल्या आहेत. यामध्ये उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी असलेले केदार साठे यांना थांबवून सतीश मोरे यांची उत्तर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. चिपळूण कापसाळ येथील सतीश मोरे हे गेल्या काही वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वी भाजपा चिपळूण तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळत पक्ष वाढवण्यासाठी अथक मेहनत घेतली. तर आता गुहागर विधानसभा संयोजक पदाची जबाबदारी सांभाळत होते. या पदाच्या माध्यमातून गुहागरमध्ये भाजपाचे संघटन मजबूत होण्यासाठी प्रयत्न केले. तर आता सतीश मोरे यांच्या पक्षीय कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर भाजपा उतर त्नागिरी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निवडीबद्दल सतीश मोरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना भाजपा उतरत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे म्हणाले, की गेल्या काही वर्षांपासून आपण भाजपा पक्षात कार्यरत आहोत. भाजपा संघटन मजबूत होण्यासाठी प्रयत्न करीत राहिलो. यासाठी भाजपा नेतृत्व व स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे नेहमीच पाठबळ मिळाले. आता तर मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण व पक्ष नेतृत्वाने आपल्यावर उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवून जो विश्वास दाखवला आहे. तो विश्वास सार्थकी लावण्यासाठी वरिष्ठांच्या नेतृत्वाखाली सर्वांना सोबत घेऊन प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली आहे.

## माजी आमदार रमेश कदम शिवसेनेच्या वाटेवर; पालकमंत्री ना. उदय सामंत यांचे संकेत!

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण- प्रतिनिधी**



चिपळूण चे माजी आमदार रमेश कदम

गेल्या काही महिन्यांपासून शिवसेना उबाठा पक्षाला गळती लागलेली असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राज्य उपाध्यक्ष माजी आमदार रमेशराव कदम हे शिवसेनेच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. रत्नागिरीचे पालकमंत्री तथा राज्याचे उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांनी चिपळूणमध्ये पार पडलेल्या एका कार्यक्रमांमध्येच बोलताना रमेश कदम यांच्या राजकीय वाटचालीचे कौतुक करतानाच महिनाभरात ते एका चांगल्या निर्णयावर येतील असे स्पष्ट संकेत दिले. पालकमंत्री ना. उदय सामंत हे चिपळुणात लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराच्या रामभाऊ साठे वस्तुसंग्रहालयाच्या उद्घाटनसाठी आले होते. त्यावेळी आपल्या मनोगतात त्यांनी माजी आमदार रमेशराव कदम यांचे तोंड भरून कौतुक केले. आपण आपल्या राजकीय जीवनाच्या प्रारंभीच्या व युवा काळामध्ये रमेशरावांचे कसे मार्गदर्शन घेत होतो आणि भाईनी आपल्याला कसे सहकार्य केले हेही आवर्जून सांगितले. पालकमंत्री बनण्यासाठी रमेशरावांनीच शब्द टाकला होता आणि म्हणूनच आपण पहिल्यांदा पालकमंत्री बनलो हा सुद्धा उदय सामंत यांनी गौप्यस्फोट केला. रमेश कदम म्हणजे संघर्ष, परंतु भाईनी मला राजकीय मदत केली त्यावेळी असा विचार केला नाही की, हा मुलगा पुढे जाऊन आपल्यापेक्षा मोठा होईल. कोणताही राजकीय स्वार्थ न ठेवता त्यांनी कामे केली. एक काळ चिपळूण तालुका त्यांच्या शब्दावर डोलायचा आणि जिल्हा हा त्यांच्या मार्गदर्शनाखाली राहायचा अशी ही पुस्तीही सामंत यांनी जोडली. उदय सामंत यांनी पुढे बोलताना मुख्य मोठा खुलासा केला की, कार्यक्रमाला येताना मी भाई आणि आमदार शेखर निकम एकत्र गाडीतून आलो. आमची सविस्तर चर्चा झाली येत्या महिन्याभरातच भाई एक चांगला निर्णय घेतील असे मी आत्ताच सांगतो. उदय सामंत यांचे बरेचसे भाषण रमेशराव कदम यांचे कौतुकावरच झाल्याने उपस्थितांमध्ये चर्चा रंगली. रमेशराव कदम आणि उदय सामंत यांच्या शाब्दिक देवाणघेण्यातून रमेश कदम आता शिवसेनेमध्ये प्रवेश करते होतील असे चित्र दिसत आहे. जर असे झाले तर चिपळूण तालुक्यातील राजकारण खूपच बदलेल आणि खास करून येत्या नगरपालिका निवडणुकीमध्ये याचा मोठा परिणाम दिसून येईल हे निश्चित आहे. एकंदरीत विरोधी पक्षातील नेते असो अथवा पदाधिकारी असो सत्ताधारी पक्षाच्या प्रवाहात सहभागी होताना दिसत आहेत.

# सिनारमन्स कंपनी पाणीपुरवठा योजनेच्या ३५६ कोटीच्या निविदा रद्द शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाई केणी यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला यश; १५ मे रोजीचा धडक मोर्चा रद्द करण्याची एमआयडीसीची विनंती

**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर**

अलिबाग तालुक्यातील शहापूर-धेरंड परिसरात सिनारमन्स कारखान्यासाठी अद्याप भूसंपादन पुर्ण झालेले नसताना पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी ३५६ कोटीच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. या विरोधात शिवसेनेचे जिल्हा प्रमुख राजाभाई केणी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटना खारेपाट विभागातील शेतकऱ्यांनी पुकारलेल्या आंदोलनाला यश आले आहे. या संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्याचबरोबर कुसुंबळे ग्रामपंचायत हद्दीतील २८ गावांना फिल्टर पाण्याची पाईप लाईन टाकण्याच्या कामाला एमआयडीसीने तत्काळ प्रशासकीय मान्यता देत १५ मे रोजी एमआयडीसी कार्यालयावर काढण्यात आलेला मोर्चा रद्द करावा, अशी लेखी विनंती केली. त्यानुसार हा मोर्चा स्थगित करण्यात आल्याची घोषणा राजाभाई केणी यांनी केली आहे कुसुंबळे विभागातून जिल्ह्यातील




मोठ्या औद्योगिक प्रकल्पांना पाण्याची पाईपलाईन जात असताना येथील नागरिक पाण्यापासून वंचित होते. राजाभाई केणी यांनी येथील हजारो नागरिकांना न्याय मिळवून देताना एमआयडीसीकडून फिल्टर प्लॅंटच्या कामाला तत्काळ प्रशासकीय मान्यता मिळवून दिली आहे. त्यामुळे येथील नागरिकांकडून राजाभाई केणी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे ज्या शेतकऱ्यांच्या जमीनीतून सिनारमन्स कंपनीसाठी पाईपलाईन जात आहे, त्या शेतकऱ्यांना अजिबात विश्वासात घेण्यात आलेले नव्हते. शेतकऱ्यांना देशोधडीला लावून उद्योगांना पायघड्या घालणाऱ्या या प्रकरणात राज्याच्या उद्योग मंत्रालयाच्या भूमिकेलाच या शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला होत. यासाठी शेतकरी संघटना खारेपाट विभागाचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख राजाभाई केणी यांच्या नेतृत्वाखाली १५ मे रोजी अलिबाग येथील एमआयडीसी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यापुर्वी एमआयडीच्या अधिकाऱ्यांनी राजाभाई केणी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना चर्चेसाठी बोलावले होते. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या अलिबाग विभागाचे कार्यकारी अभियंता संजय ननवरे यांच्याशी झालेल्या

***३५६ कोटीच्या निविदा रद्द***

प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात येत असून एकुण एमआयडीसी फेज टू अंतर्गत ७३६ हेक्टर भूसंपादन केले जाणार आहे. या प्रकल्पासाठी नागोठणे ते बांधण या २८ किलोमीटर लांबीची भली मोठी पाईप लाईन टाकली जाणार आहे. यासाठी १६७ कोटी ०८ लाख २५ हजार २५४ रुपये खर्चुन पाईपलाईन टाकण्याचे काम व हे पाणी उचलण्यासाठी बांधण येथे १८९ कोटी ७० लाख ३५ हजार ३२६ रुपये खर्चुन जॅकवेल बांधली जाणार आहे. यासाठीची मोजणी करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) ने निविदा प्रक्रिया पुर्ण केली. ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येत असल्याचे कार्यकारी अभियंता संजय ननवरे यांनी सांगितले.

चर्चेत या मागण्या मान्य करण्यात आल्या. चर्चा करण्यासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाई केणी, अलिबाग तालुका संघटक जीवन पाटील, शेतकरी संघटना खारेपाट विभागाचे सदस्य स्वप्नील म्हात्रे, मन्मय पाटील, मेघनाथ पाटील, प्रमोद पाटील, गणेश पाटील, संतोष पाटील, प्रदिप केणी, आदर्श पाटील, नाना खराडे, रघुनाथ पाटील आदी शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते. या यशस्वी चर्चेनंतर खारेपाट विभागात उत्साहाचे वातावरण आहे. धेरंड-शहापुर येथील सिनारमन्स प्रकल्पासाठी एकरी ९६ लाख ६९ हजार तर हेक्टरी २ कोटी ४१ लाखांचा दर देऊ केला आहे. तर ज्यांच्या जमीनीतून ही पाईप लाईन जाणार आहे त्या शेतकऱ्यांशी एक शब्दाची चर्चाही एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी केलेली नाही. या विरोधात येथील शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या पाईपलाईनमुळे शेतकऱ्यांची पिकती शेती काहीही मोबदला न देता बळकावण्याचा डाव असल्याचे म्हणणे संघटनेचे अध्यक्ष राजाभाई केणी यांचे आहे. १५ मे रोजीचा मोर्चा स्थगित करण्यात आला असला तरी येथील नागरिकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात सातत्याने लढत राहणार असल्याची ग्वाही शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाई केणी यांनी येथील नागरिकांना दिली आहे.

## अडचणींवर मात करत पेण मधील महिलांनी प्रथमच्या सहकार्याने मिळविले दहावीच्या परीक्षेत उज्वल यश



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

रायगड मधील पेण तालुक्यातील महिलांनी काही कारणास्तव आपले शिक्षण अर्धवट सोडले होते. मात्र, प्रथम शिक्षण संस्थेच्या "शिक्षणाची पुन्हा संधी" या उपक्रमातर्गत मिळालेल्या संधीचा लाभ घेत त्यांनी पुन्हा शिक्षण सुरू केले आणि यंदाच्या दहावीच्या परीक्षेत ९२ पैकी ८२
महिलांनी उत्तम यश संपादन केले.या उपक्रमातर्गत महिलांना मोफत अभ्यासवर्ग, वेळोवेळी चाचणी परीक्षा, आणि वैयक्तिक मार्गदर्शन देण्यात आले. 'प्रथम' संस्थेच्या या पाठबळामुळे महिलांनी नव्याने शिक्षणात रस घेतला आणि कठीण परिस्थितीतून मार्ग काढत यश मिळवलं.यावर्षी दहावीच्या परीक्षेत पुढील महिलांनी उल्लेखनीय यश मिळवलं, वृषाली पांडुरंग गायकर ३५९ गुण – ७१.८०%खारपाले, सफीना राशिद दिवडे ३५६ गुण–७१.२०% कोप्रोली, नीता ठाकूर ३५५ गुण– ७०.००% –कोप्रोली, दीपिका नरेश म्हात्रे ३४६ गुण ६९.२०% वढव..ही यशोगाथा केवळ त्यांच्या मेहनतीची नाही, तर प्रभावी अंमलबजावणीची सुद्धा आहे. ही प्रेरणादायी कहाणी अनेकांना शिक्षणाची दुसरी संधी घेण्यासाठी प्रोत्साहन देईल, अशी आशा आहे. सदर महिलांवर सगळीकडे शुभेच्छांचा वर्षावा सोबत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.त्याच बरोबर प्रथम शिक्षण संस्थेच्या उपक्रमातील पेण तालुक्यातील सर्वच प्रथम प्रतिनिधीचे यशस्वी महिलांनी आम्हाला उत्तम मार्गदर्शन केल्यामुळे आभार वेक्त केले.

# सिल्लोड येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

**सिल्लोड :-** छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त सिल्लोड येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात व तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक सिल्लोड येथे छत्रपती शंभू राजेंना अभिवादन करण्यात आले.

यावेळी सिल्लोड सोयगाव विधानसभा नेते भाजपा प्रदेश सचिव सुरेश बनकर, भाजपा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश्वर पाटील मोठे, भाजपा किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस मकरंद कोर्डे,शहराध्यक्ष मनोज मोरेल्लू, विलास पाटील, विष्णू काटकर, मधुकर राऊत, महेश शंकरपल्ली, शामराव आळणे, मोतीराम मिसाळ, नंदकुमार श्रीवास्तव, गणेश भूमकर, किरण शिरसाट, अरुण राठोड, आकाश कुमावत, योगेश साळवे, स्वप्निल शिनगारे व
पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# मोहन पाटील यांची नामको ग्राहक सेवा समिती सदस्य पदी निवड*

युवक आधार
निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी



नाशिक जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निफाड शाखेतील ग्राहक सेवा समितीच्या सदस्य पदी निफाड येथील प्रथितयश व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोहन रामकृष्ण पाटील यांची निवड करण्यात आली आहे. निफाड शाखेतून खातेदारांना उत्कृष्ट ग्राहक सेवा मिळावी आणि बँकेच्या विविध योजना व्हावी यासाठी मोहन पाटील यांच्या व्यापक जनसंपर्काचा आणि अनुभवाचा लाभ बँकेला मिळेल असा विश्वास नामको चे अध्यक्ष श्री हेमंत धात्रक, उपाध्यक्ष सुभाष शेठ नहार, संचालक सर्वश्री वसंतभाऊ गीते, नंदू नाना पवार, रंजनभाऊ ठाकरे प्रकाश शेठ दायमा, भानुदास शेठ चौधरी, बबनराव गीते, सौ. सपनाताई आनंदजी बागमार, मुख्याधिकारी विश्राम दीक्षित, शाखा व्यवस्थापक भंडारे आणि संचालक मंडळाने व्यक्त केला आहे. पाटील यांच्या या नियुक्तीचे निफाड या सहकार क्षेत्रातील मान्यवर सर्वश्री राजाभाऊ राठी, नंदलाल चोरडिया, एडवोकेट प्रवीण ठाकरे, विक्रम रंधवे, अशोक पोफळीया आदींनी स्वागत केले आहे.

# वाढदिवसाचे औचित्य साधून रा .जि .प शाळा आवरे मध्ये शैक्षणिक साहित्य वाटप


दैनिक युवक आधार
उरण प्रतिनिधी/हेमाली पाटील



जगातील खरा आनंद हा दुसऱ्याला देण्यात असतो कारण आपल्या देण्याच्या दातृत्वच्या कृतीने जर दुसऱ्याला किंवा गरजवंताला लाभ होत असेल तर असे कार्य हे ईश्वराच्या दरबारात प्रिय असते.निमित्त होते सुयश क्लासेस आवरे चे अध्यक्ष निवास गावंड सर यांचे अभिष्ट चिंतन सोहळा. 01मे रोजी वाढदिवस असतो. याच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून दिनांक 02 मे रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा आवरे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने सातवी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ पर साहित्य शैक्षणिक पॅड पट्टी व पेन अस साहित्य देण्यात आलं वाढदिवस म्हटला की पार्टी या सर्व गोष्टीवर मात करत निवास गावंड सर गेले बारा वर्ष आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करून त्यावर वायफळ खर्च न करता त्याच पैशातून सामाजिक बांधिलकी म्हणून नेहमीच आपला वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करत असतात आज देखील आपल्या वाढदिवसाच्या औचित्य साधत रायगड जिल्हा परिषद आवरे शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या वाटप करण्यात आले सदर प्रसंगी विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक गणेश गावंड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना निवास गावंड सर हे उत्तम शिक्षक तर आहेत पण विविध प्रकारच्या कला त्यांच्यात आहेत तर नागेंद्र सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना रा जि प शाळा ही अतिशय चांगल्या प्रकारची शाळा आहे शाळेतील शिक्षक गुणवंत आहेत व मला या विभागात प्लास्टिक मुक्त अभियान राबवायच आहे तर बबन पाटील सर यावेळी शाळेत होणारे विविध उपक्रम या बाबत चर्चा करून वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा दिल्या सदर प्रसंगी रा जि प शाळा आवरे चे मुख्याध्यापक श्री बबन पाटील, शिक्षक निर्भय म्हात्रे सर , गणेशप्रसाद गावंड सर , अरुणा पाटील मॅडम , सीमा कोल्हे मॅडम, पूजा चव्हाण,मॅडम आहेर सर, तसेच शालेय कमिटी सदस्या अलका गावड, राजेश्री पाटील, सदाबहार दोस्ती ग्रुप चे हरिश्चंद्र म्हात्रे,निवास गावंड सर ,सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री निर्भय म्हात्रे सर यांनी केले

# किरकोळ महागाईचा ६ वर्षांचा नीचांक

## एप्रिलमध्ये ३ .१६ टक्क्यांवर घसरण



**नवी दिल्ली :** एप्रिलमध्ये किरकोळ महागाई ३.१६ टक्क्यांपर्यंत घसरली. मुख्यतः भाज्या, फळे, डाळी आणि इतर प्रथिनेयुक्त वस्तूंच्या किमती कमी झाल्यामुळे किरकोळ महागाई दर ६ वर्षांच्या नीचांकी स्तरावर जात रिझर्व्ह बँकेच्या दिलासादायक पातळीच्या आत आली आहे.

ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) आधारित किरकोळ महागाई दर मार्चमध्ये ३.३४ टक्के आणि एप्रिल २०२४ मध्ये ४.८३ टक्के होता. जुलै २०१९ मध्ये तो ३.१५ टक्के होता.

एप्रिलमध्ये अन्नधान्य महागाई १.७८ टक्के राहिली, जी मागील महिन्यातील २.६९ टक्के आणि मागील वर्षीच्या महिन्यातील ८.७ टक्क्यांपेक्षा कितीतरी घसरली, असे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) मंगळवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार स्पष्ट झाले.

महागाई दर ४ टक्क्यांवर आणि २ टक्के - दोन्ही बाजूंनी कमी - जास्त राहील हे पाहण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेची आहे. गेल्या काही महिन्यांपासून किरकोळ महागाई दर आटोक्यात आल्याने दोन टप्प्यात प्रमुख व्याजदरात ५० आधार अंकांनी कपात करण्यात आली आहे.

रिझर्व्ह बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ग्राहक मूल्य निर्देशांक (सीपीआय) महागाई ४ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामध्ये पहिल्या तिमाहीत ३.६ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ३.९ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ३.८ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ४.४ टक्के राहण्याची शक्यता असल्याचे भाकीत केले आहे.

एप्रिल २०२५ मध्ये भाजीपाला, डाळी आणि उत्पादने, फळे, मांस आणि मासे, वैयक्तिक काळजी आणि परिणाम आणि धान्ये आणि उत्पादनांच्या महागाईत घट झाल्यामुळे मुख्य चलनवाढ आणि अन्नधान्य चलनवाढीत लक्षणीय घट झाली आहे," असे 'एनएसओ'ने म्हटले आहे.

एप्रिलमध्ये वार्षिक आधारावर बटाटा (१२.७ टक्के), टोमॅटो (३३.२१ टक्के), चिकन (६.७८ टक्के), तुळस (१४.२७ टक्के) आणि जिरे (२०.७९ टक्के) यांच्या किमतीत घसरण झाली.

एप्रिलमध्ये मोहरीच्या तेलाची महागाई १९.६ टक्के, रिफाइंड तेल (सूर्यफूल, सोयाबीन) २३.७५ टक्के, सफरचंद १७ टक्के आणि कांद्याची २.९४ टक्के होती. एप्रिल २०२५ मध्ये ग्रामीण भागातील महागाई २.९२ टक्के होती, जी २०२५ च्या मागील महिन्यात ३.२५ टक्के होती.

शहरी भागातील महागाई मार्च २०२५ मध्ये ३.४३ टक्क्यांवरून किंचित कमी होऊन एप्रिलमध्ये ३.३६ टक्क्यांवर आली. आकडेवारीनुसार, सर्वाधिक महागाई केरळमध्ये ५.९४ टक्के होती तर सर्वात कमी तेलंगणात १.२६ टक्के होती.

इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चचे असोसिएट डायरेक्टर पारस जसराय म्हणाले की, नवीनतम आकडेवारीत किरकोळ महागाईत मोठी घसरण झाली असून सलग तिसरा महिन्यात महागाई ४ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा कमी आहे. आम्हाला अपेक्षा आहे की आरबीआय २५ आधार अंकांनी व्याजदर कपात करेल. जून २०२५ च्या पतधोरण आढाव्यात नाजूक जागतिक आर्थिक आणि भूराजकीय वातावरण लक्षात घेता धोरणात्मक व्याजदरांमध्ये कपात केली जाईल.

### जून, ऑक्टोबरच्या पतधोरणात पाव टक्का व्याजदर कपातीचा अंदाज

किरकोळ महागाईच्या आकडेवारीवर भाष्य करताना, आयसीआरए लिमिटेडच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ अदिती नायर म्हणाल्या की, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये सरासरी चलनवाढ ३ .५ टक्के आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीतील आकडेवारी आरबीआयच्या पतधोरण समितीच्या (एमपीसी) या तिमाहींच्या अंदाजांपेक्षा खूपच कमी आहे. त्यामुळे या कॅलेंडर वर्षात अतिरिक्त ७५ आधार अंकांनी व्याजदर कपात करण्याची परवानगी मिळते.
जून २०२५ च्या धोरणात २५ आधार अंकांची कपात होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ऑगस्ट आणि ऑक्टोबर २०२५ च्या धोरण आढावामध्ये प्रत्येकी २५ आधार अंकांची कपात होईल. जर आर्थिक वर्ष २०२५ च्या चौथ्या तिमाहीतील जीडीपी वाढ ही आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत दिसलेल्या ६ .२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली नाही, तर पतधोरण समिती व्याजदर कमी करण्याचा विचार करू शकते. आगामी आढावामध्ये ५० आधार अंकांनी कपात केली जाऊ शकते, असे नायर म्हणाल्या.



# ट्रम्प यांच्या आदेशाचा देशांतर्गत जेनेरिक उद्योगावर परिणामाची शक्यता कमी

**नवी दिल्ली :** अमेरिकेने कंपन्यांना प्रिस्क्रिप्शन औषधांच्या किमती कमी करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्याच्या अमेरिकेच्या घोषणेचा परिणाम देशांतर्गत जेनेरिक औषध उत्पादकांवर होण्याची शक्यता कमी आहे, असे उद्योग तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या कार्यकारी आदेशात अमेरिकन आरोग्य विभागाला प्रिस्क्रिप्शन औषधांच्या किमतींमध्ये कमी करण्यास सांगितले आहे. त्याचा नवोन्मेषक औषध कंपन्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, जेनेरिक उद्योगावर परिणाम होण्याची शक्यता कमी आहे, कारण तो अत्यंत कमी नफ्यावर चालतो. अमेरिकेत, जेनेरिक उद्योग प्रिस्क्रिप्शन व्हॉल्यूमच्या ९० टक्के आहे तर

### उद्योग तज्ज्ञांचा दावा

बाजार मूल्याच्या फक्त १३ टक्के वाटा आहे, असे आयपीएचे सरचिटणीस सुदर्शन जैन यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

औषधे परवडणारी आणि उपलब्ध राहतील याची खात्री करण्यात जेनेरिक उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतो आणि अंमलबजावणी यंत्रणेबद्दल अधिक माहिती अधिक स्पष्ट करेल, असे त्यांनी सांगितले. जैन यांनी नमूद केले की या आदेशात असे म्हटले आहे की नवोन्मेषाची किंमत सर्व भागधारकांमध्ये समान प्रमाणात वाटली पाहिजे. त्यामुळे नवोन्मेषक कंपन्यांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे, त्यांच्या अमेरिकन किमती मोस्ट-फेवर्ड-नेशन किमतींशी जुळवून घेण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली.

# गोयल यांच्या नेतृत्वाखाली पथक अमेरिकेला जाणार

## १६ मे पासून चार दिवसांची व्यापार चर्चा

**नवी दिल्ली :** वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल १६ मे पासून प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारावर (बीटीए) त्यांच्या अमेरिकन समकक्षांशी चर्चा करण्यासाठी वरिष्ठ भारतीय अधिकाऱ्यांच्या पथकाचे नेतृत्व करणार आहेत, असे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले.



गोयल त्यांच्या दौऱ्यादरम्यान अमेरिकन व्यापार प्रतिनिधी (यूएसटीआर) जेमिसन ग्रीर आणि अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांच्याशी बैठका घेण्याची अपेक्षा आहे.

या वर्षीच्या सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत व्यापार कराराचा पहिला टप्पा अंतिम करण्यासाठी लवकरात लवकर दोन्ही देश वस्तूंमध्ये अंतरिम सहमती होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या पार्श्वभूमीवर चार दिवसांची ही चर्चा होत आहे.

या चर्चेद्वारे, नवी दिल्ली आणि वॉशिंग्टनमधील अधिकाऱ्यांनी ९० दिवसांच्या आयात शुल्काला स्थगिती देण्याच्या निर्णयाचा फायदा घेऊन चर्चा पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकेने भारतावरील अतिरिक्त २६ टक्के टॅरिफ ९ जुलैपर्यंत स्थगित केले आहे. वाढती व्यापार तूट भरून काढण्यासाठी २ एप्रिल रोजी याची घोषणा करण्यात आली. तथापि, देशांवर लादलेला १० टक्के बेसलाइन टॅरिफ कायम राहील.

या चर्चेला चालना देण्यासाठी भारताचे बीटीएचे मुख्य वाटाघाटीकार राजेश अग्रवाल, वाणिज्य विभागातील विशेष सचिव आणि दक्षिण आणि मध्य आशियासाठी सहाय्यक अमेरिकन व्यापार प्रतिनिधी ब्रेंडन लिंच यांनी गेल्या महिन्यात वॉशिंग्टनमध्ये तीन दिवसांची चर्चा केली होती.

# नफावसुली : सेन्सेक्स १,२८२ अंकांनी कोसळला

## आयटी, एफएमसीजी आणि वाहन क्षेत्राला सर्वाधिक फटका



**मुंबई :** मंगळवारी शेअर बाजार कोसळले. सोमवारी आयटी, वाहन आणि खाजगी बँकिंग शेअर्सची खरेदी होऊन तेजी राहिल्यानंतर मंगळवारी गुंतवणूकदारांनी विक्रीचा मारा करुन नफावसुली केली. त्यामुळे सेन्सेक्स १,२८२ अंकांनी कोसळला. दरम्यान, अमेरिका आणि चीनमधील व्यापारविषयक आयात शुल्क तणाव कमी झाल्यामुळे जोखीम असलेल्या मालमत्तेची वाढती मागणी यामुळे मंगळवारी रुपया त्याच्या सुरुवातीचा लाभ गमावत ३ पैशांनी वाढून ८५.३३ (तात्पुरता) वर बंद झाला.

बीएसई सेन्सेक्स १,२८१.६८ अंकांनी किंवा १.५५ टक्क्यांनी घसरून ८१,१४८.२२ वर बंद झाला. दिवसभरात तो १,३८६.२१ अंकांनी किंवा १.६८ टक्क्यांनी घसरून ८१,०४३.६९ वर आला होता. त्यातील २५ कंपन्यांचे समभाग घसरले आणि पाच समभाग वधारुन बंद झाले. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी ३४६.३५ अंकांनी किंवा १.३९ टक्क्यांनी घसरून २४,५७८.३५ वर बंद झाला.

### इन्फोसिस सर्वाधिक ३.५४ टक्क्यांनी घसरला

सेन्सेक्स कंपन्यांपैकी, इन्फोसिस सर्वाधिक ३ .५४ टक्क्यांनी घसरला. पॉवर ग्रिड ३ .४ टक्के, एटरनल ३ .३८ टक्के, एचसीएल टेक २ .९४ टक्के, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस २ .८८ टक्के आणि भारती एअरटेल २ .७४ टक्क्यांनी घसरले. इंडसइंड बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, एनटीपीसी, मारुती, टाटा मोटर्स आणि एम अँड एम यांचे समभागही घसरले. तर सन फार्मा, अदानी पोर्ट्स, बजाज फायनान्स, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि टेक महिंद्रा यांचे समभाग वधारले. सर्वत्र नफा कमावण्याचे प्रमाण दिसून आले. आयटी, एफएमसीजी आणि वाहन क्षेत्राला सर्वाधिक फटका बसला, असे रेलिगेअर ब्रोकिंग लिमिटेडचे एसव्हीपी, रिसर्च अजित मिश्रा म्हणाले. कालच्या तीव्र तेजीनंतर आज देशांतर्गत बाजारात नफावसुली झाली. जागतिक आणि देशांतर्गत जोखीम कमी झाल्यामुळे, व्यापार युद्धातील तणाव कमी झाल्यामुळे आणि भारत-पाक भू-राजकीय ताणतणावानंतर मिळालेल्या दिलासामुळे झालेली वाढ निश्चिंत असल्याचे दिसून येत असताना गुंतवणूकदारांनी नफावसुली केल्याचे दिसते, असे जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले. भारत आणि पाकिस्तानने लष्करी कारवाया थांबवण्याचा करार केल्यानंतर आणि अमेरिका आणि चीनने वाढीव आयात शुल्क कमी करण्याचा करार जाहीर केल्यानंतर किरकोळ आणि परदेशी गुंतवणूकदारांनी खरेदी केल्यानंतर सोमवारी सेन्सेक्स आणि निफ्टीने एका दिवसातील सर्वोत्तम वाढ नोंदवली. सोमवारी निर्देशांकांमध्ये जवळपास ४ टक्क्यांची वाढ होऊन तेजी दिसून आली.

### बहुतांश क्षेत्रांना फटका

मंगळवारी बीएसई स्मॉलकॅप ० .९९ टक्के आणि मिडकॅप निर्देशांक ० .१७ टक्क्यांनी वाढला. तसेच क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, बीएसई फोकस्ड आयटी २ .४४ टक्के, टेक २ .३९ टक्के, आयटी २ .२१ टक्के, युटिलिटीज १ .३५ टक्के, पॉवर १ टक्के, धातू ० .९५ टक्के आणि तेल आणि वायू ० .९५ टक्के घसरले. तर आरोग्यसेवा, औद्योगिक, भांडवली वस्तू, सेवा आणि ग्राहकोपयोगी वस्तू या क्षेत्रातील कंपन्यांनी वाढ नोंदवली.
आशियाई बाजारात, दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निक्केई २२५ निर्देशांक आणि शांघायचा एसएसई कंपोझिट निर्देशांक सकारात्मक क्षेत्रात स्थिरावला तर हाँगकाँगचा हँग सेंग घसरला. युरोपीय बाजारपेठा दुपारपर्यंत सकारात्मक व्यवहार करत होत्या. चीन आणि अमेरिकेतील व्यापार तणाव कमी झाल्यानंतर सोमवारी अमेरिकन बाजार लक्षणीयरीत्या वधारले. नॅस्डॅक कंपोझिट ४ .३५ टक्क्यांनी, एस अँड पी ५०० ३ .२६ टक्क्यांनी आणि डाऊ जोन्स इंडस्ट्रियल एव्हरेज २ .८१ टक्क्यांनी वाढले .जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड ० .३२ टक्क्यांनी वधारून ६५ .१७ डॉलर प्रति बॅरल झाला. एक्सचेंज डेटानुसार, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) सोमवारी १,२४६ .४८ कोटी रुपयांच्या शेअर्सची खरेदी केली.

# युनियन बँक ऑफ इंडियाकडून 'युनियन वेलनेस डिपॉझिट' सादर

## ३७५ दिवसांची रिटेल टर्म डिपॉझिट योजना



**मुंबई :** युनियन बँक ऑफ इंडियाने मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात किरकोळ ग्राहकांसाठी खास डिझाइन केलेली 'युनियन वेलनेस डिपॉझिट' ही त्यांची नवीन आणि नाविन्यपूर्ण मुदत ठेव योजना सुरू करण्याची घोषणा केली. ही योजना आरोग्य विमा आणि मुदत ठेव उत्पादन यांचा समावेश करून संपत्ती निर्मिती आणि आरोग्य संरक्षण या दोन्हींना प्रोत्साहन देण्यासाठी धोरणात्मक-रित्या डिझाइन केलेले आहे.

याव्यतिरिक्त, ते रुपे सिलेक्ट डेबिट कार्डद्वारे जीवनशैलीचे अनेक फायदे देते. ही योजना १८ ते ७५ वर्षे वयोगटातील निवासी व्यक्तींसाठी उपलब्ध आहे. यामध्ये किमान ठेव रक्कम १० लाख आणि कमाल ३ कोटी ठेवता येते.

त्यामध्ये मुदतपूर्व बंद करण्याची आणि ठेवींवर कर्ज देण्याची सुविधा आहे. या योजनेचा कालावधी ३७५ दिवसांचा आहे आणि ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ०.५० टक्का व्याजासह दरवर्षी ६.७५ टक्के दराने आकर्षक व्याजदर मिळतो. या उत्पादनाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये ३७५ दिवसांचे सुपर टॉप-अप आरोग्य विमा कव्हर समाविष्ट आहे, जे ५ लाख रुपयांच्या विम्याची रक्कम आणि कॅशलेस हॉस्पिटलायझेशन सुविधा देते, असे या लाँचिंगप्रसंगी युनियन बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ ए. मणिमेखलाई म्हणाल्या.

# जागतिक मुक्त व्यापार संकटात : महासंचालक

## जागतिक व्यापार प्रमुख जपान दौऱ्यावर



**टोकियो :** जागतिक मुक्त व्यापार संकटात आहे, असे जागतिक व्यापार संघटनेच्या प्रमुखांनी मंगळवारी जपानचे पंतप्रधान शिगारू इशिबा यांची भेट घेताना सांगितले.

जागतिक व्यापार संघटनेच्या महासंचालक न्गोझी ओकोंजो-इवेला यांनी इशिबा यांना सांगितले की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या जलद बदलणाऱ्या वाढीव आयात शुल्क आणि इतर धोरणांमुळे जागतिक व्यापारात व्यत्यय आला असल्याने खुल्या बाजारपेठांचा 'चॅम्पियन' म्हणून जपानकडून त्यांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. व्यापार सध्या खूप आव्हानात्मक काळात आहे आणि ते खूप कठीण आहे, असे त्यांनी सांगितले.

आपल्यासमोरील आव्हाने सोडवण्यासाठी आणि व्यापारातील नवीन ट्रेंडचा फायदा घेण्यासाठी आपण या संकटाचा वापर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जपानने, बहुपक्षीय व्यापार प्रणालीचा 'विजेता' म्हणून, जागतिक व्यापार संघटनेला मजबूत करण्यास आणि सुधारणा करण्यास मदत केली पाहिजे, असे इवेला म्हणाल्याचे जपानच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

# एलआयसीने बँक ऑफ इंडियामधील हिस्सा ८ .३८ टक्क्यांपर्यंत वाढवला

**नवी दिल्ली :** लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनने ९ मे रोजी बँक ऑफ इंडिया (बीओआय) मधील हिस्सा ८.३८ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. एलआयसीने २ सप्टेंबर २०२१ ते ९ मे २०२५ दरम्यान सार्वजनिक क्षेत्रातील बीओआयमध्ये सुमारे २.०२६ टक्के हिस्सा खरेदी केला आहे, असे बीओआयने मंगळवारी शेअर बाजाराला कळवले. चार वर्षांच्या कालावधीत एलआयसीचा बँकेतील हिस्सा ६.३५ टक्क्यांवरून ८.३८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाची तयारी पूर्ण : उत्कंठा शिगेला !

## गोवा येथे प्रथमच भरणार हजारो भक्तांचा कुंभमेळा !

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे

निफाड : कुंभमेळ्याला लाखो कोट्यवधी भाविक, संत-महंत एकत्र येतात, तसेच पहिल्यांदाच गोव्याच्या पावन भूमीवर १७ ते १९ मे कालावधीत एक दिव्य आध्यात्मिक कुंभमेळा भरतो आहे - 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव !' या महोत्सवात २३ देशांतील नागरिक आणि संत-महंत, धर्मप्रेमी हिंदू, तसेच २५ हजारांहून अधिक भाविक ४ ते ५ दिवस वास्तव्य करणार असून संतांच्या वाणीची ज्ञानगंगा, एक कोटी रामनाम जपयज्ञ, शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, विविध संतांच्या पावन पादुका, एक हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दुर्मिळ दर्शन आणि महाधन्वंतरी ते शतचंडी यज्ञयाग या उपक्रमांचा समावेशही आहे. महोत्सवाची सर्व तयारी पूर्ण होत आली असून लवकरच सर्वांना भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम गोव्यात पहायला मिळणार आहे,
अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री.




अभय वर्तक यांनी दिली. ते फर्मागुडी, फोंडा, गोवा येथील अभियांत्रिकी मैदानावर आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी महोत्सवाची सिद्धता पाहिल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेला उद्योजक श्री. जयंत मिरिंगकर, गोमंतक मंदिर महासंघाचे सचिव श्री. जयेश थळी, हिंदु जनजागृती समितीचे गोवा राज्य संघटक श्री. सत्यविजय नाईक व श्री. सुचेंद्र अग्नी उपस्थित होते. या वेळी श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की, सनातन धर्माचे विश्वव्यापक कार्य करणारे सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या ८३व्या जन्मोत्सवानिमित्त होणारा हा महोत्सव म्हणजेच रामराज्याच्या दिशेने एक सामूहिक पाऊल आहे. या महोत्सवातून साधक आणि धर्मप्रेमी हिंदू देव, देश अन् धर्म रक्षणासाठी नवा संकल्प घेऊन कृतीशील होतील. शंखनाद महोत्सवाची गोव्यात सर्वत्र जागृती करणारे शेकडो फ्लेक्स फलक, विविध चौकात शंखनाद करणारे भगवान श्रीकृष्णाचे कटआऊट्स, विविध मार्गांवर स्वागत कमानी, साधूसंतांची छायाचित्रांचे भव्य फलक, महोत्सवाच्या मुख्य प्रवेशद्वारावर मंदिराच्या आकाराची भव्य कमान आदी भक्तीमय वातावरण निर्माण करत आहेत. महोत्सवात ३८ फूट उंचीचा भव्य धर्मध्वज उभारण्यात येणार आहे.

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवातील वैशिष्ट्ये

महोत्सवाचे क्षेत्रफळ १ लाख २६ हजार चौरस मीटर क्षेत्रामध्ये पसरलेले असून त्यात २५ हजार लोकांना बसण्यासाठी वातानुकुलित मंडपव्यवस्था करण्यात आली आहे. एकावेळी ८ हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था, हजारो वाहनांसाठी १७ पार्किंग झोन, भाविकांसाठी ३५० प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासह भव्य धार्मिक ग्रंथ विक्री केंद्र, गो-कक्ष, श्रीअन्नपूर्णा कक्ष, गुरुमंदिर, ६ हजार चौरस फूटाचे शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, १५ संतांच्या पावन पादुका कक्ष, एक हजार वर्षांपूर्वीचे सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन कक्ष असेल; तसेच महोत्सवात सुरक्षेसाठी पोलीस मनोरे, सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक, अनेक रुग्णवाहिका, बाईक अम्बुलन्स; अग्निशमन दलाच्या गाड्या, वैद्यकीय केंद्रात १६ डॉक्टर्स, सुव्यवस्थापनासाठी प्रशासनाच्या २५ विभागांसाठी जागा, माध्यम प्रतिनिधींसाठी कक्ष, तसेच अन्य आवश्यक त्या सुविधा असणार आहेत. या महोत्सवात सुरक्षेच्या कारणास्तव सर्वांना प्रवेशासाठी शासनमान्य ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. तसेच येतांना बॅगा आणू नयेत, अशी विनंती आहे.

# ममता व मधुसूदन अग्रवाल फॉउंडेशनच्या वतीने ब्रह्माकुमारीज परिवारातील महिलांची कर्करोग तपासणी.



दैनिक युवक आधार
रिसोड/प्रतिनिधी

**रणजीत सिंह ठाकुर :-** "ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन" यांच्या वतीने 'रोगमुक्त ऋषिवट' या उपक्रमांतर्गत, जनतेच्या आरोग्यविषयक जागृती वाढवण्यासाठी ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र रिसोड येथे दि 14 मे बुधवारी मोफत कर्करोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात आधुनिक AI आधारित *थर्मल मॅमोग्राफी* द्वारे महिलांसाठी ब्रेस्ट कॅन्सर तपासणी करण्यात आली.ही तपासणी पूर्णतः मोफत, वेदनारहित आणि सुरक्षित असून, मोबाइल तपासणी व्हॅनद्वारे लोकांच्या दारात सेवा देण्याचे उद्दिष्ट आहे त्यानुसार वॅन ब्रह्माकुमारीज सेवा केंद्रासमोर सकाळी 7:30 वाजताच उभी करुन ब्रह्मा कुमारीज परिवारातील महिलांची ब्रेस्ट कॅन्सर तपासणी करण्यात आली . अतिशय मनःपूर्वक दिल्या जाणाऱ्या सेवेबद्दल ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र रिसोडच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी ज्योती दीदींनी सेवा केंद्राच्या वतीने तपासणी प्रमुख व इतर सहकार्यांना स्नेह भेट देऊन धनवाद दिले. प्रसंगी ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदी,बीके गीता दीदी, बीके वंदना दीदी, समता फॉउंडेशनचे विश्वस्त संजय उकळकर,डॉ अजय पाटील,संतोष वाघमारे,ब्रह्माकुमारीज मीडिया विंग सदस्य रवि अंभोरे, पंजाबराव देशमुख, अरुणजी लोथे, बगडिया काका, प्राचार्य बी डी घुगे, भगवान काळे, महादेव लोणकर, नंदकिशोर गाताडे इत्यादी सह ब्रह्माकुमारीज परिवारातील बहुसंख्य ज्ञानार्थी बहिणी उपस्थित होत्या.